# हाकारा

वर्ष सतरावे • अंक तिसरा

जुलै-सप्टेंबर १९९६



# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

स्फूर्तिस्थान / प्रेरणा : *कै. प्रा. गं. बा. सरदार*

## कार्यकारी मंडळ

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | डॉ. पी. व्ही. सुखात्मे (पद्मभूषण) |
| उपाध्यक्ष | : | प्रा. व्ही. जी. पेंढारकर |
| मुख्य सचिव | : | प्रा. रा. के. मुटाटकर |
| खजिनदार | : | डॉ. व्ही. एस. कुलकर्णी |
| सभासद | : | डॉ. एन. एस. देवधर |
| | : | डॉ. बी. व्ही. भानू |
| | : | डॉ. मिलिंद बोकील |
| | : | डॉ. एस. जी. देवगावकर |
| | : | ॲड. पद्माकर वळवी |

कष्टकरी जनता, भूषण भारता, वंदन करितो पददलिता !

**महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक**

# हाकारा

## अनुक्रमणिका


| | | | | |
|---|---|---|---|---|
| | या अंकाविषयी | | | २ |
| १. | नागालँडमधील आदिवासी जमाती - भाग २ | : | पुरूषोत्तम आगाशे | ३ |
| २. | महाराष्ट्रातील आदिमानव - कातकरी | : | रा. वि. भुस्कुटे | ११ |
| | कविता - कोकणचा बाजार | : | बी. एम. पवार | १४ |
| ३. | उंबरठाण आश्रमशाळेच्या स्थापनेची कहाणी... | : | ना. सी. पाटील | १५ |
| ४. | आदिवासी भगत | : | रा. वि. भुस्कुटे | २० |
| ५. | देवदासी - एक घातक प्रथा की वेश्याव्यवसाय | : | ग. शां. पंडित | २३ |
| | कविता | | | |
| | नर्मदा, मेधा आणि आदिवासी | : | वाहरू सोनवणे | २६ |
| | वनकन्येस | : | सौ. कुसूम अलाम | २७ |
| | प्रित | : | सौ. उषाकिरण आत्राम | २८ |
| | बेश्ट शेलींग पोयट | : | भुजंग मेश्राम | २९ |
| | सांग राणे ? | : | सौ. उषाकिरण आत्राम | ३० |
| | पिलेग | : | भुजंग मेश्राम | ३१ |


वर्ष सतरावे : अंक - तिसरा
जुलै-सप्टेंबर १९९६

**पत्रव्यवहाराचा पत्ता**
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११ ००७.
फोन : ३८७२१९

**संपादक**
रामचंद्र मुटाटकर

**कार्यकारी संपादक**
ग. शां. पंडित

**चित्रकार व संपादन सहाय्य**
पुरुषोत्तम आगाशे

**मूल्य रू. १५/-**

**प्रकाशक**
रा. के. मुटाटकर
सचिव, महाराष्ट्र मानव विज्ञान
परिषद यांच्यासाठी
ज्ञान प्रबोधिनी मुद्रण विभाग
५१०, सदाशिव पेठ, पुणे ३०.
येथे छापून पुणे येथे प्रसिध्द केले

**अक्षरजुळणी**
असाईन सिस्टीम्स्
दत्तवाडी, पुणे ३०.

अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी किंवा मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# या अंकाविषयी......

ईशान्य भारतातील सात राज्ये ही तेथील निसर्ग सौंदर्यासाठी प्रसिध्द आहेत. विकासापासून अनेक वर्षे वंचित राहिल्याने तिथे विभाजनवादी शक्तींनी प्रवेश केला आहे. तेथे घडणाऱ्या हिंसाचारामुळे प्रसिध्दी माध्यमांद्वारे आपल्याला या राज्यांचे दर्शन घडते. मात्र जंगल दऱ्याखोऱ्यतून रहाणाऱ्या आदिवासी जमातींमुळे हा भाग नटलेला आहे. नागालँडमधील निरनिराळ्या आदिवासी जमाती, त्यांची संस्कृती, परंपरा, चालीरिती इत्यादि गोष्टींची ओळख श्री. पुरूषोत्तम आगाशे यांनी करून दिली आहे.

आज राज्यामध्ये आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी अनेक आश्रम शाळा निघाल्या आहेत. मात्र १९५०-५५ च्या काळात या कार्याची मुहूर्तमेढ रोवली गेली. श्री. ना. सी. पाटील यांनी 'उंबरठाण येथील आश्रमशाळा स्थापनेची कहाणी या लेखातून आपल्या गतस्मृतींना उजाळा दिला आहे.

श्री. रा. वि. भुस्कुटे यांचे महाराष्ट्रातील आदिमानव कातकरी तसेच आदिवासी भगत हे दोन्ही लेख वाचनीय आहेत. श्री. ग. शां पंडित यांनी आपल्या लेखातून देवदासी प्रथेवर प्रकाशझोत टाकला आहे.

या अंकामधील श्री. वाहरू सोनवणे, श्रीमती कुसूम अलाम, श्रीमती उषाकिरण आत्राम, व श्री. भुजंग मेश्राम यांच्या आशयघन कविता म्हणजे काव्यप्रेमींना मेजवानीच ठरावी.

*हा अंक सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासकांना मार्गदर्शन करणारा व सर्वसामान्यांना माहितीपूर्ण ठरणारा आहे. आपल्या प्रतिक्रिया जरूर कळवाव्यात.*

***- संपादक***

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने या नियतकालिकास अनुदान दिले असले तरी नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

# नागालँडमधील आदिवासी जमाती - भाग २*

पुरूषोत्तम आगाशे

नागालँडची भौगोलिक रचना, प्रशासनाची ऐतिहासिक व राजकीय पार्श्वभूमी, स्थानिक प्रशासन, व्यवसाय धंदे इत्यादी गोष्टींची माहिती आपण पहिल्या भागामधून करून घेतली. आता नागालँडमधील आदिवासी जमाती, त्यांचे सामाजिक व सांस्कृतिक जीवन, चालीरीती तसेच निरनिराळ्या जमातींची वैशिष्ट्ये यांची आपण ओळख करून घेऊ.

### बोलीभाषा

नागालँडमधल्या बहुरंगी आदिवासी जमाती तिबेटो-बर्मन भाषा आपआपल्या बोलीत बोलतात. मात्र नागामिझ (नागा+ आसामिझ) ही आसामी भाषेशी जवळीक साधणारी भाषा सर्वसाधारणपणे प्रचलित आहे. नागामिझ भाषेमध्ये नागा शब्दांबरोबरच हिंदी, इंग्रजी आणि नेपाळी भाषेतील शब्दांनीदेखील शिरकाव केला आहे. हिंदी भाषेचा प्रसार आता वाढत चालला आहे. ज्या भागामध्ये नागामिझ भाषा पोहोचलेली नाही तेथे हिंदी भाषा प्रचलित झाली आहे. या भागामध्ये स्वतंत्र अशी लिपी आढळून येत नाही, सगळीकडे इंग्रजी लिपीचाच वापर केला जातो. ब्रिटिश सरकारच्या सहाय्याने ख्रिश्चन धर्मप्रसारकांनी नागालँडमध्ये शिक्षण आणि त्याचबरोबर इंग्रजी लिपीचा प्रसार केला. नागा बोलीभाषेवर खूपच मर्यादा आहेत कारण नागा भाषा फारशा प्रगत झालेल्या नाहीत. बरेचवेळा असे होते की एकाच शब्दाला अनेक अर्थ असतात. अशा वेळेस बोलण्याचा, प्रसंगाचा संदर्भ लक्षात घेऊनच त्या शब्दाचा अर्थ समजावून घ्यावा लागतो.

### 'नागा' शब्दाची उत्पत्ती

नागा हा शब्द शेजारच्या आसाम राज्यातील लोकांनी रूढ केला आहे. नागा या शब्दाची व्युत्पत्ती 'नंगा' या संस्कृत शब्दापासून झाली असावी असे एक मत आहे. फार पूर्वीच्या काळी नागा लोक अत्यंत तोकडे कपडे घालत. केवळ लज्जा रक्षणार्थ लंगोटी अथवा कापड कमरेला गुंडाळले जाई. त्यामुळेच त्यांना 'नागा' हे नाव पडले असावे.

नागा लोक इंडो मँगोलॉईड वर्णाच्या तिबेटो बर्मन या उपप्रकारामध्ये मोडतात. मध्यम किंवा त्यापेक्षा थोडासा अधिक बांधा, गोल चेहरा, बसके नाक, पिवळसर वर्ण. बारीक काळेभोर डोळे असे या लोकांचे सर्वसाधारण वर्णन करता येईल. नागा लोक आणि ईशान्य आशियाई देशातील लोकांमध्ये साम्य असून ते इंडो मंगोलॉईड प्रकारच्या वर्णात मोडतात.

### स्थलांतर

असे मानण्यात येते की नागा जमाती मंचुरिया, इंडोनेशिया, आणि फिलिपाइन्समधून निरनिराळ्या कालखंडामध्ये स्थलांतर करून बर्मा, मणिपूर अशा विविध मार्गाने आत्ताच्या नागालँडमध्ये येऊन वसल्या. वेगवेगळ्या नागा जमाती केवळ नागालँडमध्येच नाही तर मणिपूर, अरूणाचल प्रदेश, म्यानमार (बर्मा) या भागात देखील वसलेल्या आहेत.

नागांमध्ये जातीव्यवस्था नाही. मात्र प्रत्येक जमात निरनिराळ्या कुळांमध्ये विभागलेली असते. 'गोत्र' ही संकल्पना १९५० नंतर नागा लोकांमध्ये अस्तित्वात आल्याचे आढळून येते. निरनिराळ्या जमातींमध्ये संस्कृती, रूढी परंपरा, रितीरिवाज निर्माण झाले आहेत. नागा लोक नागा प्रदेशात स्थलांतरित होण्यापूर्वीच्या काळातील ऐतिहासिक नोंदी फारशा कुठे आढळून येत नाहीत.

### घरांची रचना

* *प्रस्तुत लेखाचा पहिला भाग जानेवारी-मार्च १९९६ या अंकात प्रसिद्ध झाला आहे.*

नागा लोकांची घरे अत्यंत प्रशस्त असतात. मोठमोठ्या लाकडी ओंडक्यांचा वापर करून जमिनीच्यावर काही फूट उंचीवर घरे बांधली जातात. खोलीच्या पाठीमागच्या बाजूला बैठकीसाठी मंच तयार केलेला असतो. लाकडी शिंगांनी घराचे छत सजवलेले असते. काही ठिकाणी खोलीच्या दर्शनी भागामध्ये मिळालेल्या ढाली, बक्षिसे लावलेली असतात.

तरूण अविवाहित पुरूषांची सोय 'मोरुंग' या युवागृहामध्ये मध्ये केलेली असते. काही जमातींमध्ये अविवाहित मुलींसाठीसुद्धा अशाच प्रकारची युवतीगृहे आढळतात. तरूणांच्या मनोरंजनाला वाव देण्यासाठी तसेच त्यांच्यावर लक्ष ठेवण्यासाठी 'मोरुंग' चा उपयोग होतो. मोरुंगमध्ये असलेल्या लाकडी ढोल, नगारे व इतर वाद्यांचा वापर आजूबाजूच्या गावांना सणासमारंभाचा निरोप पाठवण्यासाठी केला जातो. पूर्वीच्या काळी युद्धाची सूचना देण्यासाठी या वाद्यांचा वापर होत असे. पूर्वी जिंकून आणलेली ढाल पारितोषिके मोरुंगमध्ये ठेवण्यात येत. मोरूंगमध्ये लाकडी खांबांवर निरनिराळ्या प्रकारच्या आकृत्या कोरलेल्या असतात. शिक्षण, ख्रिश्चन धर्माचा प्रसार आणि इतर संस्कृतींच्या प्रभावामुळे मोरुंगची प्रथा कालबाह्य ठरत आहे. नागा लोक अत्यंत खेळकर, उत्साही स्वभावाचे आहेत त्यांना संगीत, नृत्य या गोष्टींची आवड असते आणि म्हणूनच फुरसतीच्या वेळी मनोरंजन करण्यासाठी त्यांनी निरनिराळ्या वाद्यांवर प्रभुत्व मिळवले आहे.

नागा लोकांमध्ये आता झपाट्याने बदल होत आहे. दुसरे महायुद्ध आणि ख्रिश्चन धर्मप्रसार यामुळे त्यांच्यामध्ये आमुलाग्र बदल घडून आले. शहर तसेच मोठ्या गावामधून पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव वाढला आहे. वेशभूषा, केशभूषा करताना इथला तरूण वर्ग पाश्चात्यांचे अनुकरण करताना दिसतो. नागा संस्कृतीचे दर्शन आता केवळ दूर खेड्यांमध्ये तसेच वृद्ध लोकांकडूनच घडू शकते.

पूर्वी प्रत्येक नागा जमातीमध्ये गोंदवून घेण्याची प्रथा होती हात, पाय, मांड्या, चेहरा, छाती या शरीराच्या भागांवर गोंदवून घेतले जात असते. कोन्याक पुरूष व महिला सौंदर्य वाढवण्यासाठी दात काळे करून घेत असत. समुद्रात सापडणाऱ्या शंख, शिंपले यासारख्या निरनिराळ्या वस्तूंपासून बनवलेले दागिने घालण्याची स्त्री पुरूषांना आवड होती. आधुनिकीकरणामुळे हे सर्व लोप पावले आहे.

### शस्त्रे

नागा लोकांची प्रमुख शस्त्रे म्हणजे धनुष्य-बाण, भाले वेतापासून बनवलेल्या ढाली आणि शिरस्त्राणे व गावठी बंदुका. भाले आणि 'डाओ'ला लाल रंग दिलेल्या शेळीच्या केसांचा वापर करून सजवतात.

### क्रीडा प्रकार

नागा लोकांना सर्व देशी व विदेशी खेळ आवडतात. हे लोक उत्तम शिकारी आहेत. भाला, धनुष्य बाण, तलवार, बंदुक यासारखी निरनिराळी आयुधे प्राण्यांची शिकार करण्यासाठी वापरली जातात. नागा लोक निरनिराळ्या प्रकारची जाळी व गळ वापरून मासेमारी करण्यात देखील पटाईत आहेत. शिकार व मासेमारीच्या खेळामध्ये 'खेल' मधील सर्व लोक सहभागी होतात. ('खेल' म्हणजे खेडेगावचा एक भाग किंवा मोठ्या खेड्यातील छोटे खेडे. एका 'खेल' मध्ये एकाच कुळातील लोक असतात.) कधीकधी तळ्याच्या पाण्यामध्ये तात्पुरता बांध घालून तर कधी पाण्यामध्ये विष टाकून मासेमारी केली जाते.

### धर्म

पारंपारिक नागा धर्म प्राणी देवतांना मानणारे होते. १९०१ सालच्या आकडेवारीनुसार त्यावेळी ९६ टक्के लोक प्राणी देवतांची पूजा करत होते. मात्र त्यानंतर ख्रिश्चन धर्माचा प्रसार झपाट्याने वाढत गेला. नागलँडमध्ये बहुसंख्य लोक ख्रिश्चन आहेत. हिंदू, बौद्ध, शिख आदि धर्माचे लोकसुद्धा इथे आढळून येतात. ख्रिश्चन धर्माच्या प्रसारामुळे मानवी हत्यांचे प्रमाण कमी झाले आहे. आता जवळजवळ ही प्रथा पूर्णपणे बंद झाली आहे. सरकारने ही प्रथा बंद करण्यासाठी कडक कायदा केला तसेच त्यासाठी कठोर शिक्षेची तरतूद

केली आहे. नागालँडमधील आदिवासी जमाती रोगराई, मृत्यु, नैसर्गिक आपत्ती तसेच इतर संकटांना दुष्ट प्रवृत्ती कारणीभूत असतात असे मानतात.

**विवाह**

नागा लोक पितृप्रधान संस्कृतीचा पुरस्कार करणारे आहेत. काही जमातींमध्ये वधुमूल्य देणे ही आवश्यक बाब नाही. मात्र लोथास जमातीमध्ये वधुमूल्याची प्रथा अत्यंत कसोशीने पाळली जाते. नागा लोक आपल्या जमातींमध्येच लग्न करतात. एकाच कुळामधील वधू-वराचे लग्न होऊ शकत नाही हा विवाहाचा मुख्य नियम आहे. सेमा जमाती व्यतिरिक्त इतर सर्व जमातीत एकपत्नीत्वाची प्रथा आहे. कधीकधी श्रीमंत नागा लोकांमध्ये बहुपत्नीत्वाचे उदाहरण पहायला मिळते. अशा वेळेस प्रत्येक पत्नीसाठी वेगवेगळे घर बांधले जाते. कारण एका घरामध्ये राहिल्यास भांडणे होतात. सेमा जमातीत एकापेक्षा अधिक लग्न करायला परवानगी असते. आणि सर्वजण एकाच घरामध्ये रहातात. अशा घरामध्ये प्रथम पत्नी हीच घराची मालकीण होते. आता स्वत:च्या जमातीमध्येच विवाह करण्याचे फारसे बंधन राहिले नसल्याने आंतर-जमातीय विवाहात वाढ झाली आहे. एकाच कुळामध्ये लग्न करण्यास प्रतिबंध असला तरी सुशिक्षित तरूण परंपरागत चालीरीतींकडे दुर्लक्ष करतात. बहुपतित्वाला अजिबात परवानगी नसते. कोन्याक सोडून इतर सर्व नागा जमातींमध्ये तरूणांना संपूर्ण लैंगिक स्वातंत्र्य आहे.

**जन्म**

'अधिक भरभराटीसाठी अधिक मुले', अशी नागा जमातींची धारणा आहे. मूल जन्मल्यानंतर माता-मुलगा असल्यास सहा दिवस तर मुलगी असल्यास पाच दिवस जेन्ना (सोयर) पाळते. प्रत्येक जमातीसाठी सोयराचा काळ भिन्न असू शकतो. ख्रिश्चन जमातींमध्ये मात्र जेन्ना पाळला जात नाही.

**घटस्फोट**

नागालँडमध्ये घटस्फोटाची प्रक्रिया अत्यंत साधी व सोपी अशी आहे. त्यासाठी न्यायालयाची मदत घ्यावी लागत नाही. वांझपणा, अनैतिक संबंध, दुर्धर रोग या कारणांशिवाय जर पतीने पत्नीला घटस्फोट दिला तर त्याला परिस्थितीनुरूप दंड द्यावा लागतो. एकमेकांशी चर्चा करून दंडाची रक्कम ठरवली जाते. सेमा अणि लोथांमध्ये घटस्फोटाचे प्रमाण अत्यंत कमी आहे. आओ जमातीत मात्र बऱ्याच मोठ्या प्रमाणात घटस्फोट घेतले जातात. घटस्फोट घेतलेली स्त्री आपल्या सर्व मुलाबाळांना पतीजवळ ठेवून जाऊ शकते. मात्र जर अंगावर पिणारे मूल असेल तर त्याचा सांभाळ घटस्फोटितेलाच करावा लागतो, त्यासाठी तिच्या पतीकडून तिला ठराविक रक्कम दिली जाते.

**सण**

नागा लोकांमध्ये निरनिराळे ऋतू व शेतीचा हंगाम यांना धरून सण साजरे केले जातात. सणाच्या वेळेस कुठलेही काम केले जात नाही. नागा जमातींमध्ये साजरे केले जाणारे प्रमुख सण पुढीलप्रमाणे - सेक्रेन्यी (अंगामी), सुख्येन्यी (चाखेसांग), आओलिंग (कोन्याक), मोन्यु (फोम), मोआट्‌त्सु व सुंग्रेमाँग (आओ), मिया आणि सोकुम (खियामुंगन), नोकन्युलान (चांग), तुलुनी (सेमा) मेदेमनिओ (यिमचुंगर), माँगमाँग (संगताम), सोकुम (खियामनगान) टोयु ईमाँग (लोथा) नृगाडा (रेंगमा) नृगा-नृगई ( झेलिआंग) इत्यादी. नागा लोक भातापासून बनवलेली दारू अशा सणांच्या वेळेस मोठ्या प्रमाणात पितात. कोन्याक जमातीत मात्र तृणधान्यापासून बनवलेल्या दारूपेक्षा अफूचे व्यसन आढळून येते. बहुसंख्य भागामध्ये चुना लावून विडा खाण्याची प्रथा दिसते.

**आहार**

प्राण्यांचे मांस किंवा भाजी बरोबर भात हेच नागा लोकांचे मुख्य अन्न आहे. तिखट पदार्थ खायची आवड असल्याने जेवणात मिरचीचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. नागा लोक सर्व प्रकारच्या प्राण्यांचे मांस भक्षण करतात. त्यामध्ये उंदिर, मांजर, कुत्रा, साप, खेकडा, कोंबडी, बकरी, डुक्कर, गाय, माकड, अस्वल, वाघ आदि प्राण्यांचा समावेश होतो. हत्तीचे मांस व कुत्र्याचे भाजलेले मांस हे प्रकार नागा

लोकांच्या अत्यंत आवडीचे आहेत. ताजे तसेच सुके मासेदेखील खाल्ले जातात. स्त्रियांनी माकडाचे व अस्वलाचे मांस खाणे निषिद्ध मानले जाते. या लोकांचा असा समज आहे की असे मांस जर का स्त्रीने खाल्ले तर होणारी संतती याच प्राण्यांसारखी निपजेल. चित्ता व वाघाचे मांस खायला पुरूषांना परवानगी नसते कारण अशी धारणा आहे की पूर्वी हे प्राणी माणसाचे दोस्त होते. हल्लीच्या काळात तरूण लोक घराबाहेर शिजवलेले वाघाचे मांस खायला लागले आहेत. लाओ-पानी (भातापासून बनवलेली दारू) हे नागा जमातींचे आवडते पेय आहे. पूर्वीच्या काळी कोराच चहा पिला जायचा. गायीचे दूध अजिबातच पिले जायचे नाही. या जमातींमध्ये असा समज होता की दूध म्हणजे गायीच्या शरीरातून बाहेर पडणारा पू. आता मात्र दुधाचा खप दिवसेंदिवस वाढत आहे.

### मृत्यु

माणसाच्या मृत्युनंतर अनेक विधी केले जातात. बहुतेक नागा जमातींमध्ये मृताला पुरण्याची प्रथा आहे. जाळणे किंवा नदीच्या पात्रामध्ये मृतदेह तरंगत ठेवणे यासारखे प्रकार आढळत नाहीत. काही जमातींमध्ये मृताने वापरलेल्या वस्तुदेखील मृतदेहाबरोबर ठेवल्या जातात. ब्रिटिशपूर्व काळामध्ये नागा लोक मृतदेह पाच सहा फूट उंचीच्या बांबूच्या मंचकावर ठेवत असत, सडण्याच्या प्रक्रियेनंतर उरलेली हाडे गावाबाहेर टाकत असत.

मृत्युनंतर मृतदेह पुरण्याअगोदर गावातील लोकांना भात व गायीच्या मांसाचे जेवण मृताच्या नातेवाईकांतर्फे देण्यात येते. मृत्युनंतर दहा दिवस सुतक पाळण्यात येते. या दिवसांमध्ये काही अन्न पदार्थ आहारातून वर्ज्य केले जातात. शेतात काम बंद ठेवले जाते. दफन भूमीमध्ये पुरलेल्या जागी मृतांच्या स्मरणार्थ दगडी स्तंभ उभारला जातो. जेणेकरून पिढ्यान पिढ्या मृताची आठवण होत राहिल.

अशी ही नागा जमातींच्या जीवनपद्धतीची थोडक्यात ओळख. नागालँडमध्ये आढळणाऱ्या भिन्न जमातींविषयी अधिक माहिती आपण आता घेऊ.

**१. झेलिआंग रोंग** - झेमेई, लिआंगमेई अणि रोंगमेई या तीन उपजमातींचे मिश्रण असलेला हा गट. या तीनही जमातींची आद्याक्षरे (झे + लिआंग + रोंग) घेऊन झेलिआंगरोंग हे नवीन नाव पडले आहे. कोहिमा जिल्ह्याच्या वायव्येला तसेच मणिपूर राज्याच्या तामेंगलाँग या ईशान्य भागात या जमातींच्या लोकांची वस्ती आढळते. झेमेई आणि लिआंगमेई जमाती या मणिपूरमध्ये 'कच्चा नागा' म्हणून तर रोंगमेई जमात 'काबुई' म्हणून ओळखली जाते. आसामच्या कछार डोंगर रांगातून सुद्धा झेमेई लोकांची वस्ती आढळून येते.

झेलिआंगरोंग लोक 'इंडो-मंगोलॉईड' प्रकारात मोडतात. काळेभोर दाट केस, तिरके डोळे, सुदृढ बांधा, उजळ कांती अशा प्रकारची त्यांची शारिरीक ठेवण असते.

स्थलांतरित पद्धतीने शेती हाच यांचा मुख्य व्यवसाय. काही ठिकाणी खाचरांची शेती केली जाते. गाय, शेळी, वराह व कोंबडी यांसारखे प्राणी खाण्यासाठी पाळले जातात. महिला हातमाग चालवण्यामध्ये तरबेज असतात. पुरूष मंडळी फावल्या वेळामध्ये बांबू आणि वेतापासून कलाकौशल्याच्या निरनिराळ्या वस्तू दैनंदिन वापरासाठी बनवतात.

जमिनीपासून थोड्या उंचावर घरे बांधली जातात. घराचे छप्पर जमिनीपर्यंत येते. गावामधल्या घरांची रचना अत्यंत सुबक असते. रस्त्याच्या दोहोबाजूंनी दोन रांगांमध्ये घरे बांधली जातात. प्रत्येक घरामध्ये दोन खोल्या असतात. झोपायची खोली आणि बैठकीची खोली.

संस्कृतीमध्ये होत चाललेल्या बदलांमुळे आता पारंपारिक वेशभूषा करण्याचे प्रमाण कमी झाले आहे. दूरवरच्या खेड्यातून मात्र वृद्ध लोक आपली परंपरा टिकवताना दिसतात. पुरूष आणि महिला गळ्यामध्ये शंखापासून बनवलेल्या तसेच रंगीत मण्यांच्या माळा घालतात. काही पुरूष हातात बाहुभूषणे घालतात. पक्ष्यांची पिसे डोक्यात खोवली जातात. निळ्या किंवा काळ्या रंगाचे कापड कमरेभोवती गुंडाळले जाते. वरचे शरीर उघडेच असते. परंतु काही लोक त्यांची

पारंपारिक शाल घेतात. ही शाल डाव्या खांद्यावरून गुडघ्यापर्यंत लांब घेतली जाते. सुशोभनासाठी कानामध्ये लाल फुले किंवा पिसे माळली जातात. तर कधी चांदीच्या रिंगा घालतात. गोंदवून घेण्याची प्रथा झेलिआंगरोंग जमातीत नाही. स्त्रिया शंखापासून, हस्तीदंतापासून, गव्याची शिंगे तसेच हाडापासून, रंगीत दगडापासून बनवलेल्या माळा गळ्यात घालतात. जस्त, पितळ्याच्या अथवा चांदीच्या बांगड्या हातात घालतात. दंडामध्ये वाकी घातली जाते. पुरूषांचे चित्त आकर्षून घेण्यासाठी स्त्रिया दागदागिने घालतात असे म्हटले जाते. अविवाहित मुली केस कापतात. लग्नांनतर मात्र केस वाढवून अंबाडा घातला जातो.

झेलिआंगरोंग जमातीत एकूण सहा कुळे आहेत - मूपामे, निकुआमे, नेवमे, निरामे, सोगोमे आणि हेझार्मे. एकाच कुळातील मुला-मुलींचे लग्न होऊ शकत नाही. लग्नाच्या वेळेस 'वधुमूल्य' म्हणून मुलाकडून मुलीच्या वडिलांना जमीन, दागदागिने मिळतात. वडिलांची मालमत्ता मुलांकडे जाते. सर्वात लहान मुलाला संपत्तीत अधिक वाटा मिळतो. मुलींना केवळ त्यांच्या आईचे दागिने दिले जातात. जर एखाद्याला मुलगा नसेल तर त्याची संपत्ती जवळच्या पुरूष नातेवाईकाला मिळते.

मोठ्या भावाच्या निधनानंतर लहान भाऊ त्याच्या मोठ्या विधवा वहिनीशी लग्न करू शकतो. मात्र लहान भावाच्या मृत्युनंतर मोठ्या भावाला विधवा वहिनीशी लग्न करता येत नाही. पुरूष बायकोच्या लहान बहिणीशी लग्न करू शकतो. मात्र मोठ्या बहिणीशी लग्न करता येत नाही. झेलिआंगरोंग जमातीमध्ये बहुपत्नीत्व आढळून येत नाही. घटस्फोट घेण्याला परवानगी असते. जर पत्नीने घटस्फोटाची मागणी केली तर तिला लग्नाच्या वेळेस घेतलेले 'वधुमूल्य' आपल्या नवऱ्याला परत करावे लागते.

प्रत्येक गावामध्ये जमातीचा प्रमुख - 'काडेईपो' असतो. 'काडेईपो' ची निवड वंशपरंपरेने होते. गावातील सर्व धार्मिक कार्यक्रम गावचा पुजारी पार पाडतो. जमिनीचे भांडणतंटे, चोरी, अनैतिक संबंध यासारखे विषय ग्रामपरिषदेमध्ये प्रचलित कायद्याप्रमाणे सोडवले जातात. गावाच्या विकास कामांसाठी आराखडा तयार करण्याची जबाबदारी ग्रामपरिषदेवरच असते.

परंपरेनुसार प्राणी देवतांची पूजा केली जाते. मृत व्यक्तीला घराजवळच पुरले जाते. दफन करायच्या जागेभोवती कुंपण उभारलेले असते. मृत व्यक्तीला दफन केलेल्या जागी अन्न आणि इतर वस्तू त्याला वापरण्यासाठी म्हणून ठेवल्या जातात. मृत्युनंतरच्या जीवनावर त्यांचा विश्वास आहे. ख्रिश्चन धर्मप्रसारामुळे सामाजिक, धार्मिक, राजकीय व आर्थिक गोष्टींमध्ये बदल होत आहे.

मुलांसाठी 'देकाचांग' किंवा 'हांगसेऊकी' व मुलींसाठी 'निऊसेऊकी' अशी वेगळी 'मोरूंग' युवा वसतिगृहे असतात. मोरूंगमध्ये आठ वर्षावरील मुले रहातात. तिथे ही मुले नाचगाणे, विणकाम, लाकडावरील कोरीव काम, बांबू व वेतकाम, यासारखी कलाकौशल्ये शिकतात. शिस्तीची शिकवणही मोरुंगमध्येच मिळते. पूर्वीच्या काळी 'देकाचांग' शिपाई शत्रूच्या हल्ल्यापासून गावाचे रक्षण करत. 'मोरूंग' पद्धत काळाच्या ओघात लोप पावत चालली आहे.

झेलिआंगरोंग जमातीचे दोन नृत्य प्रकार आहेत. एक- युद्ध नृत्य ज्यामध्ये फक्त पुरूषच भाग घेतात. दुसरे सामान्य नृत्य यामध्ये पुरूषांबरोबर महिला पण सहभागी होतात. अनेक सण साजरे केले जातात. त्यापैकी मुख्य सण म्हणजे 'मेलेथिंगी' किंवा 'नृगा-नृगाई' हा सण डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात सहा दिवस साजरा करतात. स्थलांतरित 'झूम' पद्धतीच्या शेतीमध्ये 'राब' करताना जमीन पेटवून दिली जाते. त्याची सुरवात या सणाने होते. 'हा-ना-रा' हा त्यांचा आणखी एक महत्त्वाचा सण.

**२. चाखेसंग -** फेक जिल्ह्याच्या दक्षिण भागामध्ये या जमातीचे लोक रहातात. ब्रिटिश अधिकाऱ्यांनी चाखेसंग जमातीचा उल्लेख 'पूर्वीय अंगामी' असा केला आहे. कारण या जमातीची संस्कृती, चालीरीती, अंगामी जमातीशी मिळत्या जुळत्या आहेत. या दोन जमातींमध्ये विवाहदेखील होतात.

चाखुमा, खेझमा (दोन्हीही दक्षिणात्य अंगामी) व सांगताम या उपजमातींची मिळून चाखेसंग जमात तयार झाली आहे. या जमातीचा उगम तसा अलिकडचाच म्हटला पाहिजे. चाखेसंग हे नाव १९४८ पासून धारण केले आहे. अंगामी बोलीभाषाच सर्वसाधारणपणे बोलली जाते. चाखेसंग जमातीत गाव प्रमुख नसतो. गावातीलच बुजुर्ग पुरूष व महिलेला 'जेन्ना' (सोयरसुतक व इतर बंधने) ठरवण्यासाठी निवडले जाते. निवड झालेला पुरूष उत्सव व इतर बाबींमध्ये तर महिला पिकांच्या लागवडीसाठी पाळावयाची बंधने ठरवतात.

'सुख्येन्यी' हा त्यांचा महत्वाचा सण मार्च-एप्रिल महिन्यात साजरा केला जातो. तेक्रुनियी, एरूनियी हे इतर सण होत.

**३. पोचुरी**-फेक जिल्ह्याच्या आग्नेय भागामध्ये या जमातीची वस्ती एकवटलेली आहे. त्यांची रहाणी अत्यंत साधी असते. पूर्वी चाखेसंग या जमातीचाच भाग होते.

'झूम' पद्धतीची शेती केली जाते. आता खाचर पद्धतीने शेती करण्याचा प्रघात पडू लागला आहे. त्यांच्या गालाची हाडे उठून दिसतात. गव्हाळ वर्ण हे त्यांचे वैशिष्ट्य. पोचुरी ही जमात बर्मा (म्यानमार) देशातल्या लोकांशी जवळीक साधणारी आहे.

जमातीतला - 'गाव बुरा' किरकोळ भांडण तंटे तसेच कधीकधी गुन्हेगारी स्वरूपाच्या गोष्टींमध्ये न्याय देण्याचे काम करतो. पोचुरी पुरूषांना दागिने घालणे आवडत नाही. स्त्रिया क्वचित बांगड्या घालतात. त्यांच्या शालीन्र फारसे नक्षीकाम केलेले नसते. ही शालच वस्त्र म्हणून परिधान केली जाते.

**४. अंगामी** - नागा जमातीतील सर्वात मोठा घटक म्हणजे अंगामी. ते स्वत:ला 'तेंगिमा' किंवा 'तेंग-नि-मा' म्हणवून घेतात. कोहिमा जिल्ह्यामध्ये अंगामी जमात मोठ्या प्रमाणावर पसरलेली आहे.

नागालँडच्या दक्षिणेकडून मणिपूर मधून स्थलांतर करून आत्ताच्या ठिकाणी येऊन वसले आहेत. ही जमात तीन घटकांमध्ये विभागली गेलेली आहे. 'चक्रोमा', 'तेंगिमा' आणि 'चक्रिमा' (पूर्वीय अंगामी). गावे डोंगरावर वसलेली असतात आणि अनेक खेल (कूळ) मध्ये विभागलेली असतात. घर बांधणीमध्ये सुसूत्रता आढळून येत नाही. घरे रस्त्याच्या कडेने दाटीवाटीने वसलेली असतात. अंगामी आणि चाखेसंग या दोन जमातींना संयुक्तपणे 'दाक्षिणात्य अंगामी' असे संबोधले जाते. या दोन्ही जमाती नागालँडमधल्या सर्वात पुढारलेल्या जमाती आहेत. 'झूम' पद्धतीची शेती सामुदायिकरित्या तर खाचर पद्धतीची शेती वैयक्तिकरित्या केली जाते.

अंगामी लोक उंच व सामान्य शारिरीक ठेवणीची असतात. पुरूषांच्या कमरेला आखूड कापड गुंडाळलेले असते. काळ्या कापड्याच्या दोन तिरक्या पट्ट्या छाती झाकतात. कानामध्ये पिसे, तसेच लोकरीचे गोंडे घातले जातात. 'दंडामध्ये हस्तीदंती वाकी तर गळ्यात मण्यांची माळ घालतात. महिला काळ्या कापडावर रंगीत पट्ट्यांचे नक्षीकाम केलेले कापड कमरेला गुंडाळतात. स्तन झाकण्यासाठी दुसऱ्या कापडाचा वापर केला जातो. गळ्यात माळा, हातात बांगड्या, दंडात वाकी घालतात.

अंगामी बोलीभाषेचे बर्मा, चीनी व जपानी बोलीशी साम्य आढळून येते. या जमातीत वधुमूल्याची परंपरा नाही. मात्र विवाह समयी वधूच्या पालकांना भेट म्हणून वस्तू दिल्या जातात. एकाच खेल (कूळ) मध्ये लग्न होऊ शकत नाहीत.

मृत माणसाला डाओ (एक प्रकारचे हत्यार) दोन काठ्या व भात यासह लाकडी पेटीमध्ये ठेऊन घराजवळच पुरले जाते. मृताच्या स्मरणार्थ दगडी स्तंभाचे स्मारक उभारले जाते.

सुगीनंतर डिसेंबर महिन्यात 'तेरहुनी' हा सण तर फेब्रुवारीमध्ये 'सेक्रेन्यी' हा महत्त्वाचा सण असतो.

**५. सेमा** - ही जमात स्वत:ला 'सीमी' असेही म्हणवून घेते. सेमा लोक जरी बुटके असले तरी मंगोलियन

लोकांसारखा मजबूत बांधा असतो. झुन्हेबोटो आणि वाखा या नागालँडमधील जिल्ह्यांबरोबरच आसाम आणि अरूणाचल प्रदेशामध्ये त्यांची संख्या लक्षणीय आहे.

रेंगमा नागांसारखीच सेमांची शारिरीक ठेवण असते. पुरूषांचा वेष इतर नागांप्रमाणेच असतो. महिला कमरेभोवती गुंडाळलेल्या कापडावर वेताच्या रंगीत काड्यांचा सुशोभनासाठी वापर करतात. चांदी तसेच इतर धातुंच्या दागिन्यांनी शरीर सजवले जाते.

सेमा जमात ही भटकी जमात आहे. गावात सर्वात पूर्वी स्थलांतरित झाला असेल त्याला प्रमुख बनवून नवीन गाव वसवले जाते आणि अशा प्रमुखाला गावचा पिता मानतात.

सेमा जमातीत वधुमूल्य खूप जास्त आहे. हे सर्व वधुमूल्य रोख पैशातच द्यावे लागते. या लोकामंध्ये एकपत्नीत्व पाळले जात असले तरी गावच्या प्रमुखाला तीन-चार लग्न करण्याची परवानगी असते. वडिलांनंतर प्रथम पत्नीचा थोरला मुलगा गाव प्रमुख बनतो.

तुलीनी, साधू, अवोना कुचू या मुख्य सणांच्या वेळेस मोठ्या प्रमाणावर तांदूळापासून बनवलेली दारु घेतली जाते.

**६. रेंगमा :** नागलँडमधील फेक जिल्ह्यामध्ये रेंगमा लोक रहातात. आसाममधील नौगाँग व शिवसागर जिल्ह्याच्या सीमेवरही या लोकांची वस्ती आहे. हे लोक 'अंझांग' या नावाने पण ओळखले जातात. ही जमात इतर अन्य जमातींसारखी लढाऊ वृत्तीची नाही. रेंगमा आणि आसाममधील 'मिकिर' या जमातीच्या चालीरितींमध्ये बरेच साम्य आढळते. रेंगमा व मिकिर (आर्लेंग) जमातीतील लोक एकमेकांशी विवाह करु शकतात. शारिरीकदृष्ट्या इतर जमातीपेक्षा रेंगमा काहीसे काळसर व छोट्या बांध्याचे असतात. पेहराव इतर जमातींसारखाच असतो.

रेंगमा जमातीत आठ कुळे आहेत. नांगवुन्ने, चाबिन्युई, नेंथान्युई, हेन्बुन्युई, केंपुवुन्युई, जिचेनबिन्युई, रेचबिन्युई व कानबिन्युई. एकच कुळ असलेल्या कुटुंबामध्ये लग्न होऊ शकत नाही. पूर्वी प्राणी देवतांची पूजा केली जायची आता रेंगमा लोकांनी ख्रिश्चन धर्माचा स्विकार केला आहे.

**७. आओ (औरह)** - मोकोकचुंग जिल्ह्यात ही जमात आढळते हे लोक स्वत:ला 'नि-सो-मेह' किंवा 'सा-माई-ना' असेही म्हणतात. 'पुटुमेंडेन' हे आओ गावाचे वैशिष्ट्य. प्रत्येक 'खेल' (कुल) मधून एक किंवा दोन वयस्कर लोक 'पुटुमेंडेन' या गावपातळीवरच्या परिषदेचे सदस्य असतात. साधारणपणे एक पिढी (पंचवीस वर्षे) एवढ्या काळासाठी सदस्यत्व दिले जाते.

आओ पुरुष शरिरावर गोंदवून घेत नाहीत. स्त्रिया मात्र हनुवटी, मान, स्तन, हात, पाय, आदि भागांवर विभिन्न प्रकारची नक्षी गोंदवून घेतात.

आओ शाल फारच प्रसिद्ध आहे. विविधरंगी पट्ट्यांबरोबरच मध्यभागी निरनिराळ्या प्राण्यांची चित्रे व नक्षी काढली जाते.

बोलीभाषेनुसार चोंगली, चुंगके व माँगसेन असे आओ जमातीचे तीन उपजमातीत विभाजन करता येईल. पूर्वी एकमेकांच्यात विवाह होत नसे आता मात्र हे बंधन पाळले जात नाही. वधुमूल्याची प्रथा आओ जमातीत नाही. विवाह अत्यंत साध्या पद्धतीने केला जातो. घटस्फोटाचे प्रमाण आओंमध्ये जास्त आहे.

वडिलांच्या मालमत्तेतील सर्वात जास्त वाटा मोठ्या भावाला मिळतो. या मोठ्या भावाने आपल्या लहान बहिण भावांचा सांभाळ करावा अशी अपेक्षा असते.

मृत शरिराची विल्हेवाट काही काळानंतर लावली जात असे. इतर संस्कृतींच्या प्रभावामुळे ही प्रथा मागे पडत चालली आहे.

सुंग्रेमाँग हा प्रमुख सण ऑगस्टमध्ये तर मोआत्सु मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात साजरा केला जातो.

**८. फोम** - पूर्वी ही जमात 'कोन्याक' जमातीचाच भाग समजली जायची. ही जमात मुख्यत्त्वे मॉन जिल्ह्यात आढळते. फोम लोकांची स्वत:ची बोलीभाषा आहे.

विणकामाचे कौशल्य अवगत नसल्याने पेहेरावाचे ठळक असे वैशिष्ट्य नाही. 'झूम' पद्धतीची लगावड, खडकाळ जमीन व कमी मेहनत यामुळे भात व भाज्यांचे उत्पन्न चांगले येत नाही. या सर्व गोष्टींचा त्यांच्या आहारावर परिणाम झाला आहे. आता मृतांना पुरले जाते. पूर्वी मात्र मृत शरीराला उंच लाकडी मंचकावर ठेवले जायचे.

**९. लोथा** - 'क्योनत्सु', 'मिकलाई', 'तिमोन्झ' व 'त्सॉनत्सु' या नावांनी सुद्धा ओळखली जाणारी ही जमात वाखा जिल्ह्यामध्ये बहुसंख्येने आढळून येते.

रेंगमा व आओ नागांसारखाच त्यांचा पेहेराव व चालीरीती आहेत. 'मोरूंग' ही युवकगृहे या लोकांमध्ये आढळून येतात. गावच्या जमीनीची मशागत व्हावी व योग्य पद्धतीने शेती पिकवता यावी म्हणून ही जमीन मोरूंगच्या मालकीची असते.

लोथा लोकांची 'नृगटी' ही स्वतंत्र राजकीय संस्था आहे. प्रत्येक 'खेल' मधील प्रतिनिधी या संस्थेचा सदस्य असतो. 'नृगटी' द्वारेच सारा कारभार चालवला जातो. गावबुराला अत्यंत कमी अधिकार असतात.

लोथा लोक लहान बांध्याचे काळसर वर्णाचे असले तरी पिळदार व बळकट देहयष्टी हे त्यांचे वैशिष्ट्य. लहान वयातच मुलीचा विवाह केला जातो. वधुमूल्य व विधवांचा पुनर्विवाह या प्रथा त्यांच्यामध्ये आढळतात. तोखु इमाँग हा महत्त्वाचा सण.

**१०. कोन्याक** - मॉन जिल्ह्यात रहाणाऱ्या या जमातीची संस्कृती व जीवनपद्धती ओरिसामधील बोंडो लोकांशी मिळतीजुळती आहे. इतर आदिवासी जमातीपेक्षा कोन्याक लोक मागासलेले आहेत. विणकामाची फारशी माहिति नसल्याने हे लोक अत्यंत तोकडे कपडे घालताना दिसतात. कोन्याक जमातीत अफूचे व्यसन बऱ्याच प्रमाणात आढळते. मॉन जिल्ह्यातील आदिवासींवर वर्चस्व मिळवण्यासाठी ब्रिटिशांनी सर्वप्रथम या भागात अफूची लागवड केली. आणि स्थानिक आदिवासींना व्यसनी बनवले.

'अंग' हा प्रमुख कोन्याक लोकांचा सर्वेसर्वा असतो. त्याच्या मर्जीनुसार कायदे केले जातात. सर्व गावावर सत्ता गाजवणाऱ्या या प्रमुखाची निवड वंशपरंपरेने होते. वडिलांनंतर प्रथम पत्नीच्या सर्वात मोठ्या मुलाला हे पद मिळते. 'अंग' चे घर अत्यंत प्रशस्त असते. या घरावर पहारा देण्यासाठी नागा सैनिक भाला घेऊन उभे असतात. 'अंग' एकापेक्षा जास्त लग्न करून शकतो. 'अंग' च्या मुलाला दुसऱ्या 'अंग' च्या मुलीशीच लग्न करावे लागते. अरूणाचल प्रदेशातील नॉक्टे ही कोन्याक जमातीचीच शाखा आहे असे या जमातीचे लोक मानतात. मात्र त्याला कोठेही शास्त्रीय आधार नाही.

कोन्याक ही एक प्रमुख नागा जमात आहे. बर्मा (म्यानमार) च्या सीमेलगत असल्याने या लोकांचे बर्मामधील लोकांशी नातेसंबंध आहेत. कोन्याक जमातीत दोन मुख्य प्रवाह आहेत. 'अंग'ची एकाधिकारशाही मानणारे आणि लोकशाही वर विश्वास असलेले 'शामन्युयुंगमांग'.

कोन्याकमध्ये प्रायोगिक तत्त्वावर लग्न करण्याची प्रथा आढळते. विवाहसमयी हुंडा म्हणून दागिने, भांडी वराला दिली जातात. विवाहाच्या आधी कोन्याक युवक-युवतींना अधिक लैंगिक स्वातंत्र्य असते.

लाकडावरील कोरीव कामात कोन्याक लोक वाकबगार आहेत. लाकडापासून निमुळत्या आकाराचे ढोल बनवले जातात. हल्ली कोन्याक स्त्री-पुरूषांची वेशभूषा, केशभूषा, दागदागिने, इतर नागा लोकांसारखेच असतात.

**संगताम, खियामुंगन, चांग** आणि **यिमचुंगर** या नागा जमाती ट्युएनसंग जिल्ह्यामध्ये आढळून येतात. खियामुंगन जमातीचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची विवाह पद्धती. एखादी मुलगी आवडल्यावर तिला पळवून नेऊन विवाह केला जातो. हुंडा अथवा वधुमूल्याची प्रथा या जमातीत नाही. अशा पद्धतीमुळेच बहुपत्नीत्व असलेले अनेक पुरूष नजरेस पडतात. यिमचुंगर ही जमात त्यांनी विणलेल्या 'शेंगखिम' या शालीसाठी प्रसिद्ध आहे.

ईशान्येला असलेल्या नागालँडमधील निरनिराळ्या जमातींची, त्यांची संस्कृती, जीवनशैली, परंपरा या गोष्टींची ओळख करून देण्याचा हा एक प्रयत्न.

*(Tribes of Nagaland या पुस्तकावर आधारित)*

● ● ●

# महाराष्ट्रातील आदिमानव कातकरी

- रा. वि. भुस्कुटे

कातकऱ्यांना काथोडी म्हणूनही संबोधण्यात येते. खैराच्या झाडापासून काथ करण्याच्या धंद्यावरून त्यांना 'कातकरी' म्हणून नाव पडले असावे असे काही तज्ञ म्हणतात. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांच्या मते कातकरी इसवी सन पूर्व ५००० ते ६००० वर्ष सह्याद्रीच्या माचावर रहात असावेत आणि ते महाराष्ट्राचे आद्य रहिवासी असावेत. कृत्ती म्हणजे कातडे, व पट्टीन म्हणजे तो वापरणारा यावरून ''कृत्तिपट्टन' या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश होऊन कातवडी नांव पडले असावे असे राजवाडे सांगतात. आपली उत्पत्ती रामाच्या वानरसेनेपासून झाली असा कातकरी लोकांचा समज आहे. कातकऱ्यांच्या या समजाला पुष्टी देणारी एक दंतकथाही प्रचलित आहे. लंकेतील रावणाविरूद्ध प्रभू रामचंद्रांनी ज्या माकडांच्या सहाय्यांनी लढाई करून विजय मिळविला त्या माकडांचे ते वंशज आहेत. जेव्हा राम विजयी झाला तेव्हा त्यांनी दिलेल्या वरदानामुळे ते मानव झाले. प्रचलित असलेल्या या कथा, दंतकथा समजूती यावरून एक बाब प्रकर्षाने जाणवते की कातकरी हे महाराष्ट्रातील सह्याद्रीमध्ये इसवी सनापूर्वी ४००० ते ५००० वर्षापूर्वी पासून राहणारे आद्य रहिवासी आहेत. म्हणजे ते महाराष्ट्रातील प्राचीन अगदी मुळचे म्हणजेच आदि मानव (अॅबॉरिजनल) आहेत.

### ढोर आणि सोन कातकरी

कातकरी जमात ही ढोर कातकरी आणि सोन कातकरी या दोन प्रमुख गटात विभागली आहे. त्यांच्यात रोटी बेटी व्यवहार होत नाहीत. सोन कातकरी स्वत:ला उच्च समजतात. ते प्रामुख्याने रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यात रहातात. ढोर कातकरी मेलेल्या जनावरांचे मांस खातात म्हणून त्यांना ढोर कातकरी म्हणतात ते विशेषत: ठाणे व नासिक जिल्ह्यात रहातात. ठाणे जिल्ह्यात पूर्वी ढोर कातकऱ्यांना अस्पृश्य समजत असत.

### शारीरिक ठेवण

जंगलातील अन्य जमातींच्या तुलनेने कातकरी रंगाने अधिक काळे, ठेंगणे, काटक, राकट व चपळ असतात. ते चालतांना गुडघ्यांत बाक देऊन चालतात. डोक्यावर लांब शेंडी ठेवलेले काही वृद्ध आढळतात. कातकरी स्त्रिया मध्यम उंचीच्या सडपातळ, काळसर वर्णाच्या व क्वचितच केस विंचरलेल्या असतात. सर्वसाधारणपणे कातकरी पती पत्नी बरोबर म्हणजे जोडीने फिरतांना किंवा काम करतांना आढळतात. कातकरी हे संशयी व भित्र्या स्वभावाचे असतात. या समाजाचे अनुवंशिक वैशिष्ठ्य म्हणजे वृद्धापकाळापर्यंत केस काळे रहाण्याचे प्रमाण कातकऱ्यांच्यात जास्त आढळते.

### पोषाख

कातकरी लंगोटी नेसतात. कमरेभोवती लहान फडके गुंडाळतात. अंगात कोपरी (आखूड सदरा) घालतात. खास प्रसंगी कमरेभोवती धोतर गुंडाळतात. स्त्रिया गुडघ्यापर्यंत घट्ट लुगडे नेसतात. व त्याचे एक टोक पायामधून मागे खेचतात व दुसरे खांद्यावरून ओढून मागे खेचतात. अंगात चोळी घालतात. स्वच्छतेबद्दल कातकरी साधारणत: उदासीन असतात.

### आहार आणि दारू

कातकरी रानउंदीर, खार, सहाळ, माकड, मोर, मासे, कंदमुळे तसेच नागली, वरई, हरीकची भाकरी व भात खातात. तांदुळ विकत घेणे बहुधा त्यांना शक्य नसते. सर्वसाधारणपणे कातकरी अर्धपोटी रहातात. आधुनिक भाषेत सर्व कातकरी समाज कुपोषणाचा बळी आहे. मोर व रान कोंबड्यांचे मांस त्यांना फार आवडते. सर्वपित्री अमावस्या, शिमगा, दिवाळी या सणांना तांदुळाची खीर, वडे व काही गोड पदार्थ करतात. कातकऱ्यांमध्ये दारूचे प्रमाण फार आढळते. कातकरी स्त्रियाही सर्रास दारू पितात. काही वेळा

पती पत्नी दोघेही एकत्र बसून पितात, भांडतात, मारामारीही करतात. मृताच्या तोंडातही दारूचा थेंब टाकून पुढील विधी ते करतात. धार्मिक विधीतही दारूचा उपयोग केला जातो.

## कातवडी

पंधरा वीस केंबळाच्या झोपड्या असलेल्या कातकऱ्यांच्या वसाहतीस 'कातवडी' म्हणतात. या कातवड्या जंगलात, डोंगरात आडरानात असतात. त्यांच्या घरात अत्यल्प वस्तू असतात. त्यांची चूल सामान्यत: तीन दगड ठेऊन तयार केलेली असते. कातकऱ्यांनी स्वत:साठी बांधलेली घरे क्वचितच आढळतात. शासनाने काही ठिकाणी पक्की घरे बांधून दिली आहेत. मुलाचे, मुलीचे लग्न झाले की, ती स्वतंत्र झोपडी बांधून राहतात. संयुक्त कुटुंब पद्धती अभावानेच त्यांच्यामध्ये आढळते.

## कुळी आणि आडनावे

कातकऱ्यांमध्ये पाच पोट पोटविभाग पडले ते म्हणजे १) सोन २) ढोर ३) मराठा ४) सिध्दी आणि ५) वरप. कातकऱ्यांमध्ये ९३ कुळी आढळतात. कुळी म्हणजे त्यांची आडनावेच असतात. झाडे, प्राणी व धंदा यावर आधारित किंवा कुणबी, मराठा किंवा अन्य जमातीप्रमाणे त्यांची आडनावे असतात. आदिवासी म्हणून कातकऱ्यांची स्वत:ची आडनावे आढळून येत नाहीत. अहिर, भोई, गायकवाड, कामडी, मोरे, मुकणे, शेलार, वाघ, वाघमारे, हिलम, निकुले, राऊत, पाटील, शिडवा इत्यादी आडनावे आढळून येतात.

## विवाहविधी

कातकऱ्यांमध्ये एकाच कुळात किंवा देवकात विवाह होत नाहीत. कातकरी विवाहबाह्य संबंध निषिध्द मानतात. तो गुन्हा समजला जातो. पुरूष गुन्हेगारास दंड केला जातो. तर विवाहबाह्य संबंध ठेवणाऱ्या मुलीचा प्रथम विवाहाचा हक्क नाहीसा होतो. पूर्वी बालविवाह करीत. अलिकडे मुली वयात आल्यावर विवाह करतात. मुलीच्या बापास वधु-शुल्क देण्याची प्रथा आहे. कातवडीच्या नाईकाला खूप मान असतो. तेंव्हा नाईकासमक्ष व वडीलधाऱ्यांसमक्ष ठरविलेले लग्न सहसा मोडत नाहीत. कातकरी वडीलधाऱ्यांना वयोवृद्धांना फार मानाने वागवतात त्यांच्या आज्ञेत रहातात. ब्राम्हणाकडून लग्न मुहूर्त पहात नाहीत. लग्न विशेषत: मार्गशीर्ष व माघ महिन्यात होते. सुखी वैवाहिक जीवन जगत असलेला व धर्मशील अशा कातकऱ्यांकडून लग्न लावतात. त्यास 'गोतर्णी' म्हणतात. त्याला आणखी चार कातकरी मदत करतात. त्यांना 'भार' म्हणतात. मुलीच्या घरासमोर उभारलेल्या मांडवात लग्न होते. हळद लावणे, मांडव घालणे, बाशिंग बांधणे, व प्रत्यक्ष लग्न हे विधी असतात. वधू पाच दिवस वराच्या घरी राहिल्यावर वर तिला घेऊन तिच्या माहेरी जातो. बरोबर तांदुळाच्या पिठाचे गोड लाडू नेतात. लाडू वधूच्या कातवडीवरील सर्वांना वाटतात.

## विधवा विवाह

कातकरी समाजात विधवा विवाहास मान्यता आहे. त्यास 'पाट लावणे' म्हणतात. तो रात्री विधवा स्त्रीच्या घरी लावतात. या विवाह विधीला भाट लागत नाहीत. वर वधुला मंगळसुत्रास बांधलेले पातळ व चोळी देतो. अविवाहित वक्ती विधवेशी लग्न करणार असेल तर त्यास प्रथम रुईच्या झाडाशी लग्न लावावे लागते. इतर समाजाच्या तुलनेने कातकरी स्त्री अधिक मुक्त आहे. या समाजात विवाह बंधन फार कडक नाही. जात पंचायतीत घटस्फोट घेतलेली स्त्री पुर्नविवाह करते. गरोदर स्त्रीला विशेष बंधने व विधी नसतात.

## बाळंतपण

कातकरी स्त्री प्रसुतीच्या वेदना सहन करते. झोपडीच्या एका कोपऱ्यात ती बाळंत होते. कातवडीतील अनुभवी स्त्री सुईणीचे काम करते. झोपडीच्या बाहेर आंघोळीचे पाणी जाते तेथे नाळ पुरतात व त्यावर दगड ठेवतात. बाळंत झाल्यावर कातकरी स्त्री कामही करु लागते. बाळंतपणाचे पाच दिवस 'सुवेर' पाळतात.

### भूत पिशाच्च

कातकऱ्यांचा भूत पिशाच्यावर दृढ विश्वास असतो. त्यांना ते भलतेच घाबरतात. चेडा, वेताळ, जरीमरी, म्हशा व मावळ्यापासून त्रास होऊ नये म्हणून त्यांना ते भजतात. कातकऱ्यांच्या घरातून खूप ठिकाणी चेडा नावाचा सैतानी देव आढळून येतो. मृत्यु पावलेल्या नातेवाईकांचा आत्मा मानवी शरीरात प्रवेश करण्यांत अयशस्वी ठरल्यानंतर त्याचे पिशाच्चरुपी दैवत म्हणजे चेडा होय. असे ते मानतात. कातऱ्यांच्या चेडा वरील श्रध्देमुळे त्यांना सैतानी सामर्थ्य प्राप्त झालेले असते. या समजुतीमुळे कातकऱ्याबद्दल कुणबी वगैरे अन्य लोकांना भलतीच धास्ती वाटत असते. वाघदेव हा कातकऱ्यांचा प्रमुख देव आहे. वाघ देवाची त्यांच्यावर खास कृपा असल्याचे आणि तो त्यांना क्वचीतच इजा करतो अशी त्यांची दृढ श्रध्दा आहे. गांवच्या हद्दीवर किंवा जंगलात वाघाची प्रतिष्ठापना त्यांनी केलेली असते. वाघाच्या शिकारीला कातकरी सहसा जात नाहीत.

### उपजीवीका

कातकरी भविष्याबद्दल बेफिकीर असतात. त्यांच्यात साठवून ठेवण्याची वृत्ती अभावाने आढळते. स्वत:ची शेती अवजारे बैल असणारे कातकरी हाताच्या बोटावर मोजता येतील एवढेच असतील. त्यांची उपजिवीका मुख्यत: शेतमजुरीवर अवलंबून असते. थोडी चांगली मजुरी मिळाली की ते खाडे करतात. कारण ते उद्याचा विचार सहसा करत नाहीत. शेतमजुरी व्यतिरिक्त कातकरी कंदमुळे, फळे, गवत व जळाऊ लाकडांच्या मोळ्या विकतात. लाकुडतोड व कोळसा पाडण्यात ते वाकबगार आहेत. धनुष्यबाण व भाल्याच्या सहाय्याने अचूक शरसंधान करण्यात ते प्रवीण आहेत. मासे व खेकडे पकडणे हे त्यांचे फार आवडीचे काम असते. ती त्यांना जणू करमणूकच वाटते. जंगलातील स्वच्छंदी जीवनाचा ते मनमुराद आनंद लुटतात. श्रावण व भाद्रपद महिन्यांत कामाअभावी त्यांची उपासमार होते. त्यावेळी ते पुढील येणाऱ्या शेतीच्या हंगामात काम करण्याच्या बोलीवर आपली श्रमशक्ती अगदी स्वस्तात विकतात. उचल/ कर्ज घेतात. वेठबिगारी करुन त्याची फेड करतात. त्यामुळे शेतावर, कोळसा भट्टीवर, वीटभट्टीवर पिढ्यानपिढ्या वेठबिगारीचे जीवन जगणे त्यांना भाग पडत आहे. आजही या परिस्थितीत फारसा बदल झालेला नाही.

### अंत्यविधी

कातकरी मृतदेह पुरतात किंवा जाळतात. पुरताना प्रेताबरोबर तिरकमठा, कोयता, चिलीम इत्यादी वस्तु पुरतात. या वस्तु मृताबरोबर परलोकी जातात असा त्यांचा भोळा विश्वास आहे. देवी, कॉलरा, इत्यादी साथीच्या रोगाने मृत्यु आला तर मृतास पुरतात. बाकीचे विधी कुणब्यांप्रमाणेच करतात. रात्री मृत्यु झाल्यास सकाळी अग्नी देतात. रात्रभर वाद्ये वाजवून गाणी म्हणतात. बारा दिवस सुतक पाळतात.

कातकरी भविष्याबद्दल फारसा कधी विचार करत नाहीत. सणासुदीला, यात्रेच्या वेळी कातकरी ठेवणीतले कपडे घालतात. स्त्रिया रंगबिरंगी फिती बांधतात. गळ्यात रंगीत काचमण्यांच्या माळा घालतात. हातात चांदीच्या कथलाच्या किंवा काचेच्या बांगड्या घालतात. केसात पाने व रानफुले खोवतात. त्यांची मुले मुली शिमगा, दिवाळी, गणेशोत्सव या सणांना पायात चाळ बांधून ढोलकीच्या तालावर गातात, नाचतात. गाण्यातून धार्मिक व पौराणिक कथांवर आधारित सवाल जबाब करत करत मनमुराद नाचतात. कातकऱ्यांचे तुंबडी, वादन रात्र रात्र कथा लावणे आणि नृत्य ही खासियत आहे.

*(ठाणे आणि रायगड जिल्हा गॅझटिअरच्या आधारे)*

# कोकणचा बाजार

- बी. एम. पवार

**डरा -** डोसे आज त्या काय वार?
**डवरी -** आज नावय त्या शुकीरवार
**डवरा -** आज त्या करंजळीचा बाजार नवं
**डवरी -** मग काय तुल काय माहीत नाय
**डरा -** पण आपण तं जायलाच पाहिजे.
**डवरी -** मग तिथं काय हालवत जायाचा का?
**डवरा -** एचा आपु खड्ड्यावर गेलनु त्याच पैस
**डवरी -** अव गेलतु नव पण ते साहबांनी मला गादीवर बसनू गोड गोड केला
**डवरा -** आवं पण काय केला?
**डवरी -** आप त्याला नाही व त्या चिहा केला
**डवरा -** मग काय दिला त्या साहबानी
**डवरी -** आप त्या नाय त्या हरबड खरबड भान दिला
**डवरा -** त्या काय खीर करून खायला
**डवरी -** आप त्या साहब सांग ह्या भान ओपून त्याच दाहा पाच रूपयं अलं कि त्याच्यानच बजार करा.
**डवरा -** बर चल आता बजारा
**डवरी -** आव पण बजारा काही घेयला पाहीजे
**डवरा -** ला बाटल्या बिटल्या घे
**डवरी -** आव कशालान बाटल्या त्या शिश्या घेतल्यात
**डवरा -** कशाला त्या शीश्या खडमड खडमड
**डवरा -** मग काय त्या आता हातभर लांबकुड्या बाडळ्या घेऊ
**डवरा -** पुसवी घेतली वं
**डवरी -** कशाला व ती पीशवी अव न भसली घेतलो
**डवरा -** कशाला ती भसली ?
**डवरी -** मग आता पोता घेऊ का?
**डवरा -** बर चल पाहु आता
**डवरी -** चाल चाल
**डवरा -** शेट तुमचा घोडा काय भाव दिला ?
शेट - भाऊ १५ रू. किलो
डवरा - डोसे घ्या शेट म्हणताय घोडा १५ रू. किलो
डवरा - सुकट काय भाव दिली ?
शेट - त्या ५ रू. किलो
डवरा - डोसे आव ला शेट म्हणताच ५ रू. किलो
डवरी - अव मग ती सुकटच घ्या
डवरा - शेट दारुचा दुकान कोकडं वं ?
शेट - हे खालच गलीत
डवरा - भाऊ देशी कशी काय दिली ?
दुकानदार - भाऊ ७ रूपयं
डवरा - डोसे काय देशी घेऊ ?
डवरी - घे घे
डवरा - दे भाऊ एक देशी बाटली
डवरी - डोसा लइ मस्त नव मग आणखी दोन अनखी
डवरा - तु येथेच करता येते काय?
डवरी - तू काय दर शुकीरवारी येथेच करताना येतो का?
डवरा - चाला आता घरी
डवरी - डवसा घरी बरी नाय
डवरा - मग इथच मरते अपलेल्या कोनी भाकर देईल वं?
डवरी - माल टरलंगची साडी पाहिजेल
डवरा- मग मला पण सीट पाहिजे
डवरी - तू काय नवानरमां राहिलास हाचे
डवरा - जगवेगळी बायको मिळाली माझ्या नसीबाला टरलंगची साडी पाहिजे या काळ्या घुसीला, हवा काळ्या घुसीला
डवरी - जगावेगळा नवरा मिळाला माझ्या नसीबाला सफेद धोतर पाहिजे या काळ्या उंदराला, या काळ्या उंदराला
डवरा - चाल आता घरी
डवरी - चाल चाल

# उंबरठाण आश्रमशाळेच्या स्थापनेची कहाणी...

**- ना. सी. पाटील**

सुरगाणे हे स्वातंत्र्य मिळेपर्यंत संस्थान होते. आणि या संस्थानला ''सुरगाणे महाल'' असे संबोधिले जात होते. स्वातंत्र्य आंदोलनाची चळवळ सुरगाणेच्या परिसरांत म्हणजे सुरगाणे येथील ८५ गांवाचे हद्दीत फारशी नव्हतीच.

सुरगाण्याचे राजे धैर्यशिलराव पवार संस्थानचे शेवटचे राजे, राजे सुशिक्षित आणि सुस्वभावी होते असे या भागात बोलले जाते तथापि अज्ञानी व दरिद्री जनतेमुळे तसेच संस्थानच्या अधिपत्याखाली असलेमुळे जव्हार प्रमाणे सुरगाण्याचा फारसा विकास झालेला नव्हता, स्वातंत्र्य आंदोलनाचे लोण महालाच्या सीमेपर्यंत पोहचले होते. या आंदोलनाचे अग्रवत प्रामुख्याने डांग सेवा मंडळाचे कार्यकर्ते कै. वामनराव यार्दी वकील व श्री. दादासाहेब बिडकर, कै. नानासाहेब दिक्षित, बळवंत अग्नीहोत्री हे होते. परिसरातील स्वयंसेवी शाळामुळे शिक्षणातील नवविचाराचे वारे सुरगाणे महालात वाहत होते. जनता तर खूप दबावाखाली होती, राजाची गाडी बिघडली तर ती काठीपाड्यापासून सुरगाणे पर्यंत ग्रामस्थांनी उचलून सुरगाणे येथे पोहोचवली होती. शेतीची सर्व मालकी राजाची-राजा देईल ते शेत करावे. तसेच राजाची देखील स्वत:ची जमीन पावसाळ्यांत तयार करून द्यावयाची, सुरगाणे तालुक्यांत जमीन तरी काय? सर्वांकडे आवण्याचा प्रकार व गर्द झाडी. एकुलते एक सुरगाणे येथे पोष्ट. पिसमाच्या करवी गांवचे कोतवालाने टपाल पोहोचविण्याचा प्रकार संयुक्त महाराष्ट्र मिळेपर्यंत प्रचलित होता, असा हा भाग स्वतंत्र व्हावा ही खरी श्री. दादासाहेब बिडकर, श्री. वामनराव यार्दी, श्री. ना. म. दिक्षित यांची जिद्द म्हणून सराड - हातगड-बोरगाव भागात स्वातंत्र्य आंदोलनाचा लढा चालू राहावयाचा ही गांवे सरहद्दीवरची परंतु इंग्रज हद्दीतील अशी होती. प्रचार सभा-जाहिर सभांनी स्वातंत्र्यापूर्वी जागृती होत होती.

एकदा स्वातंत्र्यसैनिक दादासाहेब बिडकर यांचे पुढाकाराने एक शिष्टमंडळ-सुरगाणे महालातील, ''मोतीबाग'' मध्ये राजे धैर्यशिलराव पवार यांना भेटले. शिष्ट मंडळाने स्वातंत्र्य मिळाले बरोबर संस्थान विलीन करावे अशी आग्रही भूमिका पाहिली, तथापि राजे यांनी ''छत्रपती कोल्हापूर राजे'' यांचेकडे बोट दाखविले. सुरगाण्याचा विस्तार तर किती ८०-८५ छोटी छोटी गांव संरक्षणासाठी १०-१२ पोलिस या परिस्थितीची जाणीव श्री. बिडकर यांनी राजाला करून दिली. या दबावामुळे तसेच छत्रपतीचे धोरणामुळे, धैर्यशिलराव पवार यांनी स्वातंत्र्य मिळताच सुरगाणे महाल भारतात विलीन केला. कै. भाऊसाहेब हिरे यांच्यामुळे ते काँग्रेस मध्ये ओढले गेले. कळवण तालुक्यांत ४०-४५ वर्षापूर्वी डांगसेवा मंडळ अभोणे केंद्रावर स्थिरस्थावर झाले, याच काळात मुंबई राज्यांत आश्रमशाळा योजना निघणार अशी चर्चा ऐकून होतो. या शाळा अति जंगल विभागात असतील असेही शासनाचे धोरण ठरले व १९५४ मध्ये ५ आश्रमशाळा मुंबई राज्यांत मंजूर झाल्या त्यापैकी एक म्हणजे एकलव्य आश्रमशाळा, उंबरठाण.

डांगसेवा मंडळाचा आदेश निघाला, जून मध्ये शाळा मंजूर झाली तरी सप्टेंबर पर्यंत कोणीच जाण्यांस तयार नव्हते. तथापि श्री. दादासाहेब बिडकर यांनी आग्रह केला आणि हे काम स्विकारण्याची जबाबदारी मी पत्करली.

त्याकाळी सुरगाणे भागात एस.टी. नव्हती जेमतेम एक हाफटन पांडाणे ते सुरगाणा चालायची तथापि पावसाळ्यांत ६ महिने तीही बंद असायची. ऑक्टोबरमध्ये उंबरठाण येथे रूजू होण्याचा आदेश निघाला. पांडाण्याहून १५-१६ मैल पायी चालत जाऊन बोरगांव येथे मुक्काम केला. बोरगांव पासून उंबरठाण २५ मैल होते. तेथे मधुकर म्हैसणे, नाना मास्तर हे सहकारी भेटले, त्यांना घेऊन सुरगाणे येथे पोहोचलो.


तेथे प्रभाकर कुलकर्णी सारखी देव माणसे भेटली. त्यांनी आदरातिथ्य केले. आणि ३ ऑक्टोबरला दुपारी निघून उंबरठाणला मधुकर म्हैणे, नाना मास्तर सह पोहचलो. जंगलातून नद्यानाले, खाचखळगे ओलांडत पायीच प्रवास करावा लागला. साप-विंचू काट्याकुट्यापासून रक्षण करण्यासाठी काठी हाच खरा साथीदार.

त्यावेळी उंबरठाण येथे दोनच दुकाने, सुशिक्षित म्हणून तीनच माणसे. एक जि.प. शाळा मास्तर, दुसरा शिपाई आणि तिसरा फॉरेस्टर/एका दुकानांत गेलो. दुकानदाराने चहा दिला. सायंकाळ होण्यांस आली. परंतु पुढे काही बोलेचना सर्वांनी समज घेतली. समोर एकच खोली असलेल्या मराठी शाळा सुटल्यावर सतरंजी पसरवली आणि आम्ही तिघेही बसलो. विचार सुचला, २-३ जर्मनची भांडी आदिवासींकडून मिळविली. डाळ तांदूळ विकत घेतले आणि स्वयंपाक करून छानपैकी ओट्यावरच झोपलो.

उंबरठाण तर अगदीच दुर्गम भागात नासिक धरमपूर बाजरा डांगचे सरहद्दीवर. काय करावे सुचेना बरोबरचे साथी सकाळीच पायी निघून गेले. मी मात्र एकटाच तेथे उरलो. सकाळी प्राथमिक शाळेचे मास्तर श्री. धूम गुरूजी आले. आदिवासीच परंतु अति सज्जन गृहस्थ. त्यांना सर्व योजना सांगितली, त्यांनी धीर दिला आणि या कामास लागा माझे सहकार्य राहील असे आश्वासन दिले. त्यांचा पदर धरला आणि त्यांचे घरीच मुक्काम ठोकला. जरा निवारा मिळाला, थोडी भाषा आत्मसात करण्याचा प्रयत्न केला आणि १०-१२ दिवस आजूबाजूच्या भागाचे निरीक्षण-परिक्षण केले. लोकांचे दारिद्रय पाहिले. त्यांच्याशी संपर्क साधला आणि या निवासी आश्रमशाळा योजनेची माहिती देण्याचा प्र[illegible] सुरू केला.

११ ऑक्टोबर १९५४ रोजी शासनाच्या वतीने ४ शिक्षण तज्ञ त्या भागात पाहाणीसाठी आले होते. त्यात नगरचे हिवाळे नांवाचे तज्ञ होते असे आठवते. त्यांचेशी चर्चा केली. तथापि भावनेच्या भरात न जाता, दिवाळी नंतर १ डिसेंबर पासून ही शाळा सुरू करावी असे त्यांनी सांगितले. तथापि हा सल्ला मानवला नाही, आणि ४-५ दिवस पुन्हा नेटाने प्रयत्न केला. एक झोपडी मिळविली. तिची दुरूस्ती केली. शेजारी राहाणाऱ्या पोलिसांशी दोस्ती केली आणि त्यांचे सल्ल्याने विद्यार्थ्यांची यादी तयार केली. १६ ऑक्टोबर १९५४ रोजी ११ लंगोटी लावलेली, ४ अर्धवट फाटक्या चड्डीची १५ मुले जमा केली, मला ४ मुलीही मिळाल्या. अशा प्रकारे १९ विद्यार्थी जमवून एका झोपडीतच आश्रमशाळा सुरू केली. संस्थेला रिपोर्ट केला, शाळा सुरू झाल्याने सर्वांना आनंद झाला.

१६ ऑक्टोबर १९५४ रोजी आश्रमशाळा सुरू झाल्याची वार्ता डांगसेवा मंडळाकडे पोहोचलेवर पदाधिकारी यांना समाधान वाटले. ऑक्टोंबर अखेर मंडळाचे चिटणीस श्री. ब. ल. अग्नीहोत्री येऊन गेले. मंडळाकडे त्यावेळी जीप होती. परंतु ती जेमतेम सुरगाणा पर्यंत यावयाची पुढे पायीच प्रवास करावा लागायचा. त्यांनी आश्रमशाळा पाहिली. ३०x२० ची पर्णकुटी वजा झोपडी. त्यातच शाळा त्यातच रसोडा, माझा निवाराही तेथे. आजुबाजूला या पर्णकुटीपेक्षाही निकृष्ट दर्जाची घरे होती. गावात व्यापाऱ्यांची दोनच घरे थोडीशी बरी त्यामुळे जागेचा प्रश्न त्यांना अगत्याने जाणवला. शेजारीच भालेराव नावाचे हवालदार राहत होते. नोव्हेंबर मध्ये त्यांची बदली झाली. त्यांचे घर यापेक्षाही लहान. परंतु एकाचा निवारा व्यवस्थित होईल असे होते. त्यांना मी ही जागा मागितली. त्यांनी सांगितले की, छपरासाठी रूपये २५/- खर्च झाला आहे. तो मी त्यांना लगेच दिला व निवाऱ्यासाठी २५/- रूपयात मला जागा मिळाली. त्यामुळे थोडे स्थैर्य आले. चिटणीसांच्या भेटी नंतर मंडळाचे अध्यक्ष दादासाहेब बिडकर येऊन गेले. बिडकरांना या भागात चांगला नावलौकिक मिळाला होता. स्वातंत्र्यसैनिक आणि सुरगाणा संस्थान खालसा करण्यात त्यांचा पुढाकार म्हणून त्यांचे नांव या आदिवासी भागात सर्वश्रुत होते. आदिवासींबद्दल त्यांना खरा जिव्हाळा होता. त्यांचेवर झालेले अन्यायाला वाचा फोडण्यासाठी डांगसेवा मंडळाचे कार्यालयातून स्वतंत्र यंत्रणा राबविली जात होती. त्या यंत्रणेत पंडित धर्मा पाटील, न. ह. पाटील, नथू मोतीराम शिरूडे असे ध्येयवादी कार्यकर्ते



काम करीत होते. त्यामुळे आश्रमशाळा, वसतीगृहे, स्वयंसेवी शाळा चालविणाऱ्या शिक्षकांना दादासाहेब हा एक मोठा दिलासा होता. माध्यमिक शाळेचे लोण आदिवासी सेवा समिती मार्फत सुरगाणे पर्यंत पोहोचले होते. त्यामुळे त्यांचे केंद्रही एक मोठा आधार हाता. निदान उंबरठाणहून सुरगाणे येथे गेलेवर तास दोन तास थांबण्याचे निवारा केंद्र हे होते. पायी प्रवासामुळे निवाऱ्याची गरज होतीच.

दादासाहेब बिडकर येऊन गेल्यामुळे शाळेसाठी आणि इमारतीसाठी जागा पाहण्याचे नियोजन झाले. शाळेला योग्य अशी १०-१२ एकर जमीन व इमारतीसाठी गावाला लागून एक एकर जमीन त्यांना दाखविली. सुरगाणे संस्थान नुकतेच विलीन झालेमुळे त्याकाळी जमीन जागा खरेदीचे व्यवहार होतच नव्हते. सर्व व्यवहार तोंडीच विश्वासावर केले जात होते ही घटना आज कोणास पटणार नाही. त्याकाळी तोंडी नोंदीवरच तलाठी नोंद करीत होते.

शाळेसाठी व इमारतीसाठी जमिनी मिळविणे ही फार सोपी बाब त्यावेळी मला जाणवली. गावाला लागून जी एक एकर जमीन होती. त्यावर बांबूची बेटे होती. ती बेटे जाळली तर सलग एक एकराचा पट्टा तयार होत होता. आणि त्याला लागूनच सार्वजनिक विहिर होती. ही जागा शाळेसाठी घ्यावी असा तेथील एक व्यापारी जगनशेठ सुर्यवंशी यांचा सल्ला होता. जगनशेठ आमचेशी चांगला वागू लागला. कारण आमचेमुळे त्यांचे दुकानदारी वाढण्यास मदत झाली. ही जागा डांगसेवा मंडळास दाखविली त्यांनीही हिरवा कंदिल दिला.

या जागेचे मालक एका देवीचे भगत हाते. त्यांच्यापुढे

ही कल्पना आम्ही मांडली. थोडे आढेवेढे घेतल्यानंतर त्यांनी होकार दिला. मात्र माझे मुलास शिक्षण द्या, त्याला आश्रमशाळा वसतीगृहात घ्या असा त्यांनी आग्रह धरला. गावसहकार्य मिळविण्याचे दृष्टीने ३-४ स्थानिक मुलांना मी प्रवेश दिला. त्यात याही मुलास प्रवेश दिला. चंद्रा भगताने शाळेला जागा मोफत दिली याचे डांगसेवा मंडळास फार कौतुक वाटले. सुरगाणे तालुक्यात सर्वोदय उपमंत्री द. ना. वांद्रेकर आले असता उंबरठाण येथेही त्यांची सभा ठेवली होती. त्या सभेत चंद्रा भगत याचा वांद्रेकर यांचे हस्ते शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. त्याचा परिणाम असा झाला की, या जागेवरचे बांबुचे बेटे काढणे, जाळून टाकणे, जागा स्वच्छ करणे या कामास गावकऱ्यांनी चांगला प्रतिसाद दिला आणि शाळा इमारतीचे स्वप्न गांवकरी शिक्षक यांचेपुढे पडू लागले.

सुरगाणे तालुक्याचे पश्चिम भागात उंबरठाण येथे स्वातंत्र्य मिळालेनंतर प्रथमच १९५५ मध्ये मुंबई राज्याचे उपमंत्री श्री. द. ना. वांद्रेकर या भागांत आल्यामुळे तसेच त्यांचे बरोबर कलेक्टर. डि.एफ.ओ. व जिल्हाधिकारी आलेमुळे लोकांचे मनात आश्रमशाळेबाबत बरेच कुतुहूल निर्माण झाले होते, आणि शाळेला एक विशिष्ट प्रकारचा अलिखित दर्जा प्राप्त झाला. चंद्रा भगत यांचे सत्कारामुळे लोकांना शाळेबाबत अधिक जवळीक वाटू लागली. ग्रामस्थ इमारतीची स्वप्ने पाहू लागली. या संधीचा आम्ही भरपूर उपयोग करून घेण्याचे ठरविले आणि शाळेसाठी लागणारी जमीन जी आश्रमशाळेसाठी गरजेची असते ती मिळविण्याचा प्रयत्न करू लागलो. उंबरठाण लगतच देवीपाडा यांचे दरम्यान एक ओढा आणि त्याला लागून १०-१२ एकराचा जमिनीचा पट्टा ३-४ आदिवासी बांधव करीत होती. संस्थानिकाचे काळातीलच सरकारची जमिनी ही भावना समाजात रूढ होती. देवापाड्याचा पोलीस पाटील अंदु पाटील सतत शाळेला सहकार्य करत होता. त्यांचे सल्ल्याने सदर जमीन शाळेला मिळावी असा मी प्रयत्न सुरू केला.

हा माझा विचार चालू असतानाच श्री. शेळके नांवाचे मामलेदार उंबरठाण येथे आले त्यांना आश्रम शाळेच्या ध्येय धोरणांची मी कल्पना दिली. शाळा ही शेती बेसिक असावी ही माझी पूर्वीपासून धारणा आजही तग धरून आहे आणि आश्रम शाळेचे ध्येय धोरणही हेच आहे, याची शेळके मामलेदार यांना कल्पना असलेमुळे त्यांनी सदर जमीन आश्रम शाळेला देण्याचे नियोजन करण्यांस सांगितले. त्याचा सल्लाही चांगला वाटला. ही शेती ज्या आदिवासी वालींची आहे, ते तेथे गवत हेच पीक घेत होते. त्या ऐवजी त्यांना भात शेती करता येईल असे म्हैसखडक डोहाजवळची माळरानावरची शेती सध्यापेक्षा दुप्पट देण्याचा आमचा अलिखित करार झाला. आणि पोलीस पाटील, अंदु पाटील यांच्या मध्यस्थीने शाळेला हवी असलेल्या जमीनीवरचा हक्क त्यांनी सोडला आणि म्हैस खडक माळावरची जमिन आनंदाने कसू लागले व भाताचे उत्पन्न काढू लागले.

शाळेला शेती मिळाल्यामुळे आणि इमारतीसाठी जमीन मिळाल्यामुळे माझा उत्साह वाढला. विद्यार्थी, वर्ग वाढले आणि खंडेराव वामन वाणी, तसेच सौ. गंगुबाई विजय पाटील असे सहकारी मिळाले. मात्र आता पर्णकुटी फार अपुरी वाटू लागली. या पर्णकुटीला नांव काय द्यावे असा विचार करीत असतांनाच ''एकलव्य'' शब्द आम्हांस सुचला. आणि लेटरहेड व रबरी शिक्का बनवून 'एकलव्य आश्रम शाळा' हे नामकरण करून टाकले. दादासाहेब बिडकर यांना ही कल्पना फार आवडली आणि याच कल्पनेचा पाठपुरावा डांगसेवा मंडळाच्या आश्रम शाळांमध्ये अजुनही चालू आहे. स्थानिक शिक्षकच नांवाचा निर्णय घेतात. सर्व कांही नावात समाविष्ठ आहे हे उद्‌गार चिपळूणकर यांनी एका शाळेच्या समारंभात काढले होते. ते सार्थ वाटतात.

१९५५-५६ चा हा काळ आश्रमशाळा पर्णकुटीचा तथापि शिक्षण व शेती यांची सांगड मी घालण्याचा प्रयत्न केला. खंडेराव वाणी हे उत्कृष्ट शिक्षक तसेच गजुताई पाटील या मेहनती तथापि सांस्कृतिक कार्यक्रमाची आवड असणाऱ्या होत्या. त्यांच्या गुणांचा भरपूर उपयोग करून घेतला. ग्रामस्थांचे लक्ष वेधावे म्हणुन स्वच्छता, टापटीप, सांस्कृतिक

कार्यक्रम, लोकसंपर्क अधिक वाढवित गेलो. तसेच पालक सभा, परिसरातील लोकांचा मेळावा आदि नियोजन करीत गेल्यामुळे भागाधिकारी, तालुक्याचे अधिकारी यांनाही शाळेचे आकर्षण वाटू लागले. त्यामुळे इमारतीची आग्रही भूमिका ग्रामस्थ घेवू लागले. बांबूचे बेट त्यांनी साफ करून दिल्यामुळे त्यांचाही आग्रहाचा विचार करू लागलो. विटा कशा पाडाव्यांत, लाकूड कोठून आणावे, इमारत कौलाची की, पत्र्याची या बाबत डांगसेवा मंडळाचे पदाधिकारी श्री. दादासाहेब बिडकर, श्री. बाळासाहेब अग्नीहोत्री यांचेशी चर्चा सुरू केली. प्रथम जी नविन इमारत जागेला कंपाऊंड करून एकदाची विविध प्रकारची दिसायला चांगले असे मात्र स्वत:चे कल्पनेने बांधून ठेवले.

आश्रमशाळा निर्मितीसाठी ज्या विविध व्यक्तिंनी प्रयत्न केलेत त्यात प्रामुख्याने गांधीवादी कार्यकर्तेच निदर्शनास येतात. १९५२-५३ या वर्षात ज्यावेळी डांगसेवा मंडळात होतो त्यावेळी ऐकत होतो की, मुंबई राज्याने आदिवासीसाठी आश्रम शाळा योजना भारत सरकारकडे सूचविली आहे. या सूचविलेल्या व्यक्तिच्या नांवाचा कानोसा घेता त्यात प्रामुख्याने जूगत रामभाई दवे. श्रीकांत भाई, दादासाहेब बिडकर, आचार्य भिसे यांचे नाव ऐकिवात होते.

सुरगाणा महालातील जनता अत्यंत दरिद्री आणि अशिक्षित होती. शिक्षणासाठी एकही माध्यमिक विद्यालय नव्हते. ७ वी पर्यंत एकुलती एक प्राथमिक शाळा व एक विद्यार्थी वसतिगृह सुरगाणे येथे होते. वणी ते घागबारी-बोरगाव हातगड रस्त्याच्या पलिकडचा भाग महाला मध्ये समाविष्ट होता त्यात सुरगाणे उंबरठाण, पळसन, बाऱ्हे ही प्रमुख गावे. या ठिकाणी यांचे जेमतेम बाजार भरतो म्हणुन प्रसिद्ध होती. उंबरठाण पलीकडील वांगण-रयतविहीर-चिंचपाडा-पांगारकडे चिंचपाळे, जिल्हाला लागून हा पट्टा असलेमुळे बारागांव डांग प्रचारात होता. गुजराथी मंडळींनी जंगल सोसायटीच्या माध्यमातून आदिवासींच्या आर्थिक उन्नतीचे प्रयत्न डांग सेवा मंडळाप्रमाणे या भागातही सुरू केले हाते. याच माध्यमातून त्यांनी काही गुजराथी स्वयंसेवी शाळा सुरू केल्या होत्या. याला शह देण्यासाठी डांग सेवा मंडळानेही डांग जिल्ह्याप्रमाणे या भागांत मराठी माध्यमाच्या शाळा सुरू केल्या.

भारत सरकारच्या शिक्षण खात्याने आश्रमशाळा उघडण्याचा प्रस्ताव मंजूर केला आणि मुंबई राज्य शिक्षण खात्याचे वतीने ही योजना मंजुर करण्यांत आली. राज्यात प्रथम ५ आश्रम शाळांना मंजुरी मिळाली. कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांचे प्रयत्नाने अदिवासी सेवा समितीला चिंचवड ता. पेठ येथे आश्रम मंजूर झाला तर श्री. दादासाहेब बिडकर यांचे सल्ल्याने ना. वांद्रेकर यांनी उंबरठाण हे ठिकाण निश्चित करण्यांस लावले. त्या पाठीमागचा विचार असा की, या भागात मराठी शाळेचे उंबरठाण हे प्रमुख केंद्र बनेल. लांबच्या संपर्कामुळे कार्यकर्ते जातील येतील त्यातून त्या भागात सुविधा उत्पन्न होतील आणि त्याचा परिणाम म्हणून उंबरठाण येथे बऱ्याच आधुनिक सुविधा या ४० वर्षात निर्माण झाल्या आहेत. रस्त्यांच्या सोयी तर पूर्वीपेक्षा अधिकच चांगल्या आहेत.

● ● ●

# आदिवासी भगत

**- रा. वि. भुस्कुटे**

जादूविद्येमध्ये पारंगत असणाऱ्या, जादूविद्येच्या बळावर अलौकिक शक्तीवर ताबा मिळविण्याची पात्रता असणाऱ्या व्यक्तीला भगत म्हणतात. व्यक्तीची, जमातीची संकटे दूर करण्यासाठी भगत आपल्या जादूविद्येचा वापर करीत असतो. अतिमानवी शक्तीच्या इच्छेवर व्यक्ती व जमाती यांच्या आयुष्यातील सुखदु:खे ठरत असतांना अलौकिक शक्तींवर नियंत्रण ठेवण्याचे कसब भगताचे अंगी असते. म्हणून आदिवासी समाजातील व्यक्ती आपत्काळी भगताच्या आश्रयाला जात असतात. भगताचा शब्द म्हणजे देवाचा शब्द असे आदिवासी मानतात.

### अलौकिक शक्ती व सामान्यांमधील दुवा

अलौकिक शक्तीला आपलेसे करण्याचे कसब भगताला असते. जादूविद्या व धार्मिक विधी यात तो पारंगत असतो. जादू करीत असतांना मंत्रोच्चार कसे करावेत हे त्याला चांगले अवगत असते. त्याला सर्व तऱ्हेचे मंत्र येत असतात. मोहिनी मंत्र, रोगनिवारक मंत्र, हवापाण्यावर ताबा मिळविण्याचे मंत्र, पिके उत्तम येण्याचे मंत्र, हिंस्र जनावरांचा बंदोबस्त करण्याचे मंत्र त्याला येत असतात. अलौकिक शक्ती आणि सामान्य लोक यांना जोडणारा जणू तो दुवाच असतो.

### नवीन भगत


विशिष्ट मनोवृत्ती असलेला व दैवी कृपा असलेला भगत जन्माला आलेला असतो की भगताला विशिष्ट प्रकारचे शिक्षण देऊन तयार केलेले असते हा एक वादविषय आहे. याचे कारण आदिवासी समाजात याबाबत उलट सुलट उदाहरणे आढळतात. काही आदिवासी समाजात भगताची घराणी वंशपरंपरेने चालू असतात. तर काही आदिवासी समाजात भगत शिक्षण देऊन तयार केले जातात. ठाणे जिल्ह्यातील वारली जमातीत त्यांना भगताईचे शिक्षण दिले जाते. भगताईचे हे शिक्षण केवळ पुरुषानांच नाही तर स्त्रियांनाही दिले जाते. बहुसंख्य आदिवासी जमातीतून भगतच नवीन भगत तयार करीत असतो. गुरुच आपला शिष्य निवडतो. शिष्य परंपरा अशी जपली जाते. नवीन शिष्याच्या डोक्यात व तोंडात भगत फुंकर घालतो. त्यामुळे भगताच्या दैवी शक्तीचे संक्रमण शिष्याच्या शरीरात होते. एवढेच नव्हे तर एका सुरीचा वार आपल्या शरीरावर करुन मग तो शिष्यावर करतो त्यामुळे भगताचे रक्त शिष्याच्या रक्तात मिसळते व मग तो शिष्य पूर्ण भगत होतो.

### खडतर जीवन

भगताला दैवी सिध्दी लाभली की त्याचे समाजातील स्थान उंचावते हे खरे पण त्याचे जीवन म्हणजे पुष्पशय्या नसते. त्याला कोणत्याही प्रकारचे स्वैर व मुक्त जीवन जगता येत नाही. त्याला अत्यंत खडतर असे असिधाराव्रत स्विकारावे लागते. कडक ब्रम्हचर्य पालन त्याच्याकडून अपेक्षित असते. तो अतिशय थोडे अन्न खातो. इतरांशी संबंध ठेवत नाही. अत्यंत जुन्यापुराण्या त्याज्ज वस्तू स्वत:साठी वापरतो. तो आपल्या जागी झोपून असतो किंवा रानावनात भटकत राहतो. व्रतस्थ जीवन त्याला जगावेच लागते. कारण व्रतस्थ भगताच्या आवाहनाला दैवी शक्ती सहाय्याला येत असते. प्रभावी भगताच्या हाकेने हरीणांचा कळप भुकेल्या आदिवासींसमोर येऊ शकतो. इतकेच काय पण पाऊस पाडण्याचे सामर्थ्यही त्याला लाभलेले असते. थोडक्यात खडतर जीवन जगणाऱ्या भगताचे सामर्थ्य वाढलेले असते. त्यामुळे त्याच्याबद्दलचा आदरही द्विगुणीत झालेला असतो. त्याला साधुकोटीत बसविले जाते.

### रोग निवारण कार्य

भगत समाजाची अत्यंत उपयुक्त कार्ये करत असतो. व्यक्ती व जमात यावरील संकटे दूर करण्याचे सामर्थ्य त्याला लाभलेले असते. तो आदिवासी जमातीचा जणू डॉक्टरच असतो. कोणीही आजारी पडला की त्याला भगताकडे नेले जाते. आदिवासींची श्रध्दा असते की कोणताही रोग असला तरी त्याचे प्रमुख कारण देवतांची अवकृपा किंवा पूर्वजांचा राग किंवा चेटूक असते. यापैकी कोणत्या कारणाने रोग झाला याचे निदान भगतच करु शकतो. चेटूक असल्यास ते उतरविणे, देवदेवता असंतुष्ट असतील तर त्यांना संतुष्ट करणे किंवा पितर कोपले असतील तर त्यांना संतुष्ट करणे ही कामे केवळ भगतच करु शकतो. आजाराचे एकदा का निदान झाले की योग्य ते मंत्र उच्चारुन ताईत, गंडे आदि वस्तु दैवी सामर्थ्याने भारावून देणे, भूत पिशाच्चाला हाकलून देणे हे उपचार तो करतो. भगताला चांगले औषधी ज्ञानही असते. तसेच त्याला काही वनस्पतीची चांगली माहिती असते. ही औषध देण्याची विद्या पवित्र रहावी म्हणून तो काही कडक पथ्येही पाळीत असतो. त्याचबरोबर आलेल्या रोग्याला मसाज करणे, दुखलेला भाग दाबणे, रोकणे इत्यादी करुन रोगी व्यक्तीला तो देवळात झोपायला सांगतो. रोगाची साथ आल्यास वस्तीच्या सर्व सीमेवर मंतरलेले तांदूळ फेकतात. नंतर कोंबडे मारुन टाकले जाते. रोग निर्माण करणाऱ्या देवीला संतुष्ट करण्यासाठीची ही उपाययोजना असते. वेदनामय बाळंतपण सुकर करण्याचे कामही भगत करतो. गर्भपात करायचा झाला तर झटपट व सहजपणे तो करतो. मंत्राचे सहाय्याने गर्भाशय निरोगी करण्याचे अवघड कामही भगत करतो अशी आदिवासींची श्रध्दा आहे.



### हवापाण्यावर नियंत्रण

निसर्गामध्ये घडणाऱ्या अदभूत घटनाचे आदिवासी साक्षीदार असतात. त्यांना निसर्गाबद्दल नेहमीच जिज्ञासा अचंबा आणि भयंकर धास्तीही वाटत असते. ज्वालामुखी, भूकंप, धुवांधार पाऊस, गारपीट, सर्व जीवन उध्वस्त करणारी वादळे आणि महाभयानक वणवे यामुळे आदिवासींच्या जीवनावर दूरगामी परिणाम होत असतो. या सर्वांचा कर्ता करविता दुसरा तिसरा कोणी नसून ती अलौकिक शक्तीच असते अशी त्यांची ठाम समजूत असते. या अलौकिक शक्तीला काबूत ठेवण्याचे तंत्र भगताला माहित असल्याबद्दलचा ठाम विश्वास आदिवासींना असतो. वादळवारा, गारपीट वगैरे सारे काही भगत त्याच्या मंत्रसामर्थ्याने थांबवू शकतो. अशी त्यांची श्रध्दा असते. अशा नैसर्गिक आपत्तीचे वेळीही ते भगताकडे धाव घेतात.

**प्रिय व्यक्ती वश करणे**

आदिवासी स्त्री पुरुष संबधाकडे अत्यंत निकोप दृष्टीने पहातात. मदनदेवावर त्यांची अतीव भक्ती असते. स्त्री पुरुषांनी एकमेकांच्या प्रेमात पडणे हे ते महत्वपूर्ण मानतात. प्रिय व्यक्तीच्या मिलनासाठी जेंव्हा ते उत्सुक होतात तेंव्हा ती व्यक्ती लवकर वश व्हावी, तिची प्राप्ती व्हावी म्हणूनही भगताकडे हे धाव घेतात.

**दैवी इच्छेचा वेध घेणे**

सर्व परंपरांवर नियंत्रण ठेवणारी एक अलौकिक शक्ती आहे. तिच्या इच्छेने दुनियेमध्ये बऱ्यावाईट घटना घडत असतात. व्यक्तीच्या किंवा जमातीच्या जीवनात घडणाऱ्या भल्या बुऱ्या प्रसंगाचा कर्ता करविता ही दैवी शक्ती असते. तेव्हा या शक्तीला संतुष्ट करण्याचे मानवी जीवनातील दु:ख निवारण होऊ शकते असे आदिवासींना वाटते सहाजिकच दैवी शक्तीशी संधान बांधून त्यांच्याशी संवाद करु शकणाऱ्या भगताकडे ते धाव घेतात. भगत आपल्या मंत्राच्या बळावर या दैवी इच्छेचा अंदाज घेतो. भविष्य कथन करतो. जमातीवर येऊ घातलेल्या संकटापासून वेळीच त्यांना सावध करतो. काही शकुनांचा आधार घेऊनही तो भविष्य कथन करतो.

**अनन्यसाधारण स्थान**

भगताकडे ''एक अवलिया'' म्हणून पाहिले जाते. दैवी सिध्दी प्राप्त झालेला मांत्रिक बळ लाभलेला असा एकमेवाद्वितीय म्हणून त्याला समाजात बहुमान लाभतो. त्याच्या इच्छा पुऱ्या करण्यासाठी व्यक्ती आणि समाज काळजी वाहतात, झटतात. त्यांचा राग ओढवणे समाजावरची एक आपत्ती असते. आदिवासींच्या या असीम श्रध्देमुळे सामान्य लोकांवर समाजाने आग्रहपूर्वक लादलेली बंधने भगताला लागू केली जात नाहीत. सर्व बंधना पलीकडला तो असतो. सहाजिकच त्यांच्या वैषयिक किंवा सामाजिक वर्तनाकडे समाज गंभीरपणे पहात नाही. भगताची कार्य, त्याची वैशिष्ट्ये पहाता भगताचे आदिवासी समाजातील स्थान अनन्यसाधारण असते.

आदिवासींमध्ये कार्य करणारे कार्यकर्ते, संस्था आणि संघटना यांच्या दृष्टीकोणातून अंधश्रेध्देला जोपासणारे त्यास खतपाणी घालणारे आदिवासींमधील भगत आहेत. आदिवासींच्या आरोग्य, शिक्षण आणि आर्थिक उन्नतीला मारक ठरणारी भगतागिरी आहे. हे देखील निर्वावाद आहे. तेव्हा अंधश्रध्दा निर्मूलनाचा आदिवासींमध्ये प्रचार करताना भगतांकडून होणाऱ्या फसवणूकीविरूध्द आदिवासी कार्यकर्त्यांना प्रशिक्षित करणे अनिवार्य ठरते. तरी देखील भगतगिरी नष्ट करण्यासाठी ''आदिवासी भगत'', त्याचे स्वरुप नीट समजून घेणे आदिवासी जनमानसावर त्याचा प्रभाव आहे हे जाणून घेणे अत्यावश्यक ठरते.

● ● ●

# देवदासी - एक घातक प्रथा की वेश्या व्यवसाय?

- ग. शां. पंडित

'देवदासी' म्हणजे एखाद्या देवतेला वाहिलेली मुलगी. देवाची सेवा करुन गणिक वृत्तीने राहणारी स्त्री. मूल होण्याकरीता किंवा मूल जगण्याकरता पहिले मूल देवाला वाहण्याचा नवस केला जात असे. आणि अशा, देवाला वाहिलेल्या मुलांमध्ये मुलींचेच प्रमाण अधिक असे.

देवदासी प्रथा धार्मिक श्रध्देतून उगम पावली आहे. देवाच्या सेवेत जीवन घालवल्यामुळे पुण्य लाभून देहाचे सार्थक होईल, एवढीच भावना सुरुवातीला लोकांच्या मनात होती, पण ज्याप्रामणे देवाला अर्पण केलेले पूजोपचार त्यांचा पुजारी स्वीकारतो आणि तरीही ते देवाला पावतात, त्याचप्रमाणे पुजाऱ्याची सेवा केली तर तीही देवाला पावते, अशी समजूत कालांतराने प्रसृत करण्यात आली. त्यामुळे पुजाऱ्याने देवदासीचा उपयोग घेतला तर तो देवानेच घेतला, अशी भावना पुढे उत्पन्न झाली. सहाजिकच देवाला अर्पण केलेल्या मुली या पुजाऱ्यांच्या दासी बनल्या व राजे, सरदारांच्या विलाससुखासाठीही त्यांचा उपयोग होऊ लागला.

विशेष म्हणजे जातके, अर्थशास्त्र, कामसूत्र वगैरे प्राचीन ग्रंथामध्ये देवदासीचा उल्लेख आढळत नाही. परंतु पुराणांमध्ये मात्र देवपूजेसाठी देवदासींची आवश्यकता मानली असून , त्यासाठी सुंदर मुली देवाला अर्पण कराव्या असे सांगितले आहे.

### देवदासींचे प्रकार

मध्ययुगात देवदासी प्रथा सुरु झाली. कर्नाटकात या युगात काही जातीत प्रत्येक घरातली एखादी मुलगी देवाला अर्पण करीत, असे म्हणतात. तेथे देवदासीला 'बसवी' म्हणत, विशेषत: लिंगायत व होले या लोकांत ही प्रथा अधिक प्रचलित होती. या बसव्या देवदासींची कामे जातीच्या बैठकीला, विवाहाला आणि इतर समारंभाना उपस्थित राहणे, धार्मिक विधी आचरण्यात इतर स्त्रियांना मदत करणे व वधुवरांना आरती ओवाळणे अशा प्रकारची होती. बसव्यांना आई-वडिलांकडून वारसा हक्क मिळत असे.

दक्षिण भारतात ही देवदासी प्रथा विशेष प्रचलित होती. कालांतराने देवदासींची एक जातच बनली. देवाला मुली वाहण्याची प्रथा दक्षिणेतच अधिक दिसून येते. त्यातही कर्नाटक, महाराष्ट्र, गोवा येथे मोठ्या प्रमाणात, गोव्यात बौध्द कालापासून देवदासी होत्या. महाराष्ट्रात खंडोबाला मुरळी म्हणून मुली वाहिल्या जातात. पुरुष वाघ्या म्हणून ओळखले जातात.

कर्नाटकात बेळगाव जिल्ह्यातील सौदत्ती येथे दर पौर्णिमेला देवदासींची जत्रा भरते. त्यात माही (माघ) पौर्णिमेला (जिला 'रांड पुनव' असेही म्हणतात.) मोठी जत्रा भरते. त्या जत्रेत यल्लमा देवतेला मुली वाहण्याची प्रथा पूर्वापार चालत आली आहे. या देवदासींना 'जोगतिणी' म्हणतात. केसांचा 'जट' आल्यावर (केस गुंतल्यावर) तो देवीचा कोप मानून ती मुलगी देवीला वाहण्यात येते. या जोगतिणी गळ्यात मण्यांच्या किंवा कवड्यांच्या माळा घालतात. डोक्यावर 'जग' (देवीचा पितळी मुखवटा ठेवलेली परडी) वाहून नेतात व कपाळावर भंडारा लावतात. चोंडक, टाळ व तुणतुणे यांच्या साथीने देवतेच्या स्तुतीपर गाणी गातात. वेगवेगळ्या देवदासींना वेगवेगळी नावे आहेत. ओरिसात मारिस, कर्नाटकात 'बसवी', आराधिणी, महाराष्ट्र-गोव्यात नायकिणी, भाविणी, जोगतिणी, मुरळ्या इत्यादी. देवदासींचे स्थूलमानाने दोन प्रकार मानता येतील.

१) नृत्य, गायन, वादनात कुशल कलावंतिणी किंवा नायकिणी, यातील बहुतेक स्त्रिया एकाच पुरुषाशी कायमचा संबंध ठेवून नैतिक दृष्टीने चांगले जीवन जगतात.

२) देवळातील झाडलोट, सडासंमार्जन, दिवेसफाई,



भिक्षा व वेश्या व्यवसाय हीच त्यांच्या चरितार्थांची साधने राहिली.

**आरोग्याचे प्रश्न**

अस्वच्छता व अनेक पुरुषांशी संबंध यामुळे देवदासींना संसर्गजन्य रोगांनी पछाडले नाही तरच नवल! त्यातही 'जोगतिणी' देवदासींची व्यथा आणखीनच वेगळी. त्यांच्या केसांच्या जटाचे वजन ३ ते ४ किलो. त्यामुळे त्यांना डोकेदुखीचा त्रास कायमचाच. जटांच्या ओझ्यामुळे मान वळवता येत नाही. केसांच्या मुळांना ताण पडत असल्याने झोप यायची नाही. आडवं झोपता येत नाही. एकाच कुशीवर पडून रहावे लागते. केसात उवा, किडे पडतात. जटेला देवी मानलं जाते. त्यामुळे कापता, सोडवता येत नाही. उलट जटेलाच नैवेद्य दाखविला जातो. पूजा केली जाते.

महाराष्ट्रातील म. फुले समता प्रतिष्ठान, सावली, अंधश्रध्दा व देवदासी मुक्ती केंद्र यांसारख्या काही संस्थांच्या प्रयत्नांमुळे बऱ्याचशा जोगतिणींनी अलिकडे 'जट' सोडवून अथवा कापून घेतल्या आहेत. जट सोडवणे तसे फारच अवघड, तसेच खर्चिक काम. परंतु काही कार्यकर्ते, सेवाभावी वृत्तीचे लोक यांच्या आर्थिक सहकार्यामुळे ते शक्य होते. जट ठेवणे ही अंधश्रध्दा आहे हे काही देवदासींना आता पटू लागले आहे, पण काही प्रमाणात ही अंधश्रध्दा अजूनही टिकून आहे.

इत्यादी कामे करणाऱ्या, मागासलेल्या जातीच्या भाविणी. या मुलींना देवाला वाहण्याचा जो विधी करतात. त्याला 'शेस विधी' म्हणतात. हा विधी म्हणजे मुलीला पुरुषसंबंध करण्याची दिक्षाच समजली जाते. हा विधी धर्मसंमत नाही, तर परंपरागत रुढाचार होता. देवदासींच्या उदरनिर्वाहासाठी पूर्वी देवस्थानच्या जमिनी दिलेल्या असत. कालांतराने मात्र

**समाजातील स्थान**

समाजात वेश्यांना जे स्थान दिले जाते. तेच देवदासींना

आहे. किंबहुना देवदासी म्हणजेच वेश्या हे समीकरण झाले आहे. पांढरपेशा समाजाकडून तर अवहेलना, तिरस्कार या भावनाच त्यांच्या वाट्याला येतात. पुरुषांच्या दृष्टीने देवदासी ही केवळ मालकी हक्काची उपभोगाची वस्तू असते. त्यामुळे देवदासींविषयी समाजाची भावना सहानुभूतीची नसून अलिप्त स्वरुपाचीच असते, असे म्हणता येईल.

दुर्दैवाने देवदासींना रीतसर पती मिळणे अशक्य. त्यात त्यांचा इतर पुरुषांशी शारीरिक संबंध आल्यानंतर मूल होणे ही तितकीच नैसर्गिक गोष्ट आहे. अशा संबंधामुळे त्यांच्या शरीराचं मातेरं झालेलं असतंच व शेवटी बेवारशी मरणही त्यांच्या वाट्याला येते. पण त्यांच्यानंतर त्यांच्यापेक्षा अधिक परवड होते ती त्यांच्या मुलांची. 'बाप' म्हणून कुठलाही पुरुष आपले नाव द्यायला तयार नसतो. त्यामुळे या मुलांना शिक्षण तर सोडाच पण चोर, मवाली, दलाल याव्यतिरिक्त इतर कोणताही व्यवसाय वा नोकरी देण्यास लोक तयार होत नाहीत. आणि मुलगी असेल तर तिला 'वेश्याव्यवसाय' करण्याशिवाय पर्याय नसतो.

**समाजाची जबाबदारी**

देवदासींची, स्त्री-जातीला घातक ठरणारी ही प्रथा बंद करण्याचा प्रयत्न इ. स. १९१० पासून कायदा करण्यात आला आहे. निरनिराळ्या राज्यांनी देवतेला मुली वाहण्यास प्रतिबंध करणारे असे कायदे करुनही अद्याप ही देवदासी प्रथा पूर्णत: बंद झालेली नाही, आणि ती पूर्णपणे बंद करणे खरोखरच शक्य आहे का? या प्रश्नाचे उत्तरही सोपे नाही. अशावेळी समाजाने देवदासींकडे केवळ सहानुभूतीने न पाहता, समाजाचा एक घटक म्हणून आपल्याही काही जबाबदाऱ्या आहेत. याचे पुढील बाबतीत स्मरण ठेवायला हवे. देवदासी सुध्दा आपल्यासारख्या माणूस आहेत असं पाहणं.

देवदासींना या व्यवसायापासून परावृत्त करण्यासाठी त्यांची आर्थिक गरज भागविणे आवश्यक आहे. यासाठी त्यांना 'वेश्या व्यवसाया' व्यतिरिक्त सदर समाजमान्य व्यवसाय उपलब्ध करुन द्यायला हवेत.

अंधश्रध्देपोटी या प्रथेला स्त्रिया बळी पडलेल्या असतात. अंधश्रध्दा दूर करुन त्यांच्यात जीवन श्रध्दा जागविण्यासाठी या स्त्रियांना आवश्यक ते शिक्षण व ज्ञान देऊन अधिक जागरुक करणं गरजेचं आहे.

गुप्तरोग, एड्स, टी. बी, कुष्ठरोग यांसारख्या संसर्गजन्य रोगांची लागण वेश्याव्यवसाय करणाऱ्या देवदासींना लवकर होऊ शकते. त्यासाठी त्यांच्या आरोग्याची काळजी घेणं जरुरीचं आहे.

सर्वात महत्त्वाचं म्हणजे या स्त्रियांना, मुलांना चांगलं शिक्षण देणं, त्यांच्याकडे लक्ष देणं. समाजाने या मुलांकडे दुर्लक्ष करणे म्हणजे गुन्हेगारी वाढविण्यासाठी हातभार लावण्यासारखंच आहे.

या स्त्रियांना समर्थ बनवायचे असेल तर वरील सर्व गोष्टींचे भान ठेवणे आवश्यक आहेच; त्याचबरोबर त्या शोषण करणाऱ्या शक्तीविरुद्ध समर्थपणे उभ्या राहू शकतील हे आत्मभान जर त्यांच्यात निर्माण केले तर त्यांच्या देहाची होणारी परवडही थांबेल; देवदासींबरोबर विवाहास प्रवृत्त होणाऱ्या तरुणांची आज गरज आहे.

*संदर्भ*

*१) मराठी विश्वकोश, खंड ७*

*२) भारतीय संस्कृती कोश, खंड ४*

*३) वेश्या आणि त्यांच्या मुलांचे प्रश्न ० (पुस्तिका) सुगावा प्रकाशन*

*४) धार्मिक - अनिल अवचट*

● ● ●

# नर्मदा-मेधा आणि आदिवासी !

- वाहरू सोनवणे

नर्मदेचे नांव घ्यावं आणि मेधाचं नाव घ्यावं
दोघांबद्दल सारखाच आदर वाटतो, लोकांना.

नर्मदेचे धरण आणि आदिवासींचे मरण,
मेधा तडफते बिजली सारखी
मेधा गीत गाते
'पेट मावली पेट....'
नर्मदेचे पाणी पेटून उठते
संघर्षाचा वणवा दऱ्याखोऱ्यात पसरतोय.

जीवन कसे जगावे-मेधा सांगते
मार्ग कसे काढावे-मेधा सांगते
प्रश्न कसे सोडवावे-मेधा सांगते
आदिवासींना पटवून देतांना
मेधा त्यांच्या हृदयात जाऊन बसते

आदिवासी दु:खाचे नाते
जगाच्या दु:खाशी जोडते
आणि मेधा उमलते फुलासारखी
मेधा फुलराणी, भल्या संघर्षाची!

कुणाही महात्म्याबद्दल
काहीही बोलू नये;
पण काहीच बोलू नये?

मन मोकळे करतांना सांगावेसे वाटते---,
मेधा, नर्मदेत तुला पोहता येते
तू जीव वाचवतेस---
नर्मदेत वाहून जाणाऱ्यांचे
पण असे किती दिवस?
आयुष्य दोन दिवसाचे
तिसऱ्या दिवशी
त्या आदिवासींचे काय?

म्हणून मेधा, ''त्यांना' पोहायला शिकव
'त्यांना' स्वावलंबनाची दिशा दाखव
म्हणजे ते रडणार नाही
अश्रु गाळणार नाही
अश्रुंच्या महापुरात ही 'ते'
पोहत जातील आणि पार होतील
त्यांचे जीव वाचेल आणि त्यांचे जीवन
मेधा 'तें' तुझे गीत गातील
तुझी 'जीत' गातील
मेधा, तुझे जीवन, जीवन संघर्षाचे !

# वनकन्येस

- सौ. कुसुम अलाम

वनकन्ये,
द्राक्षघडासारखे रसरसलेले तुझं केतकी वर्णिय तारूण्य
चांदण्या रात्री ओठावर रेलॉ घेऊन येते
तेव्हा पैंजणांनी वेढलेले तुझे पाय
ढोलाच्या तालावर थिरकतात
आणि नकळत तुझे संगमरवरी हात
तुझ्या सख्याच्या कमरेत गुंततात
याचेही तुला भान नसते
त्यावेळी तुझा नाच पाहून
आकाशीचा चंद्र नाचायला येतो तुझ्या सवे
त्यावेळी धरतीही श्रृंगारगीत उधळत असते बेभान होऊन
त्या नयनमनोहर दृष्यात
दिवसभर श्रमलेले शरीर
प्रसन्नतेच्या शिखरावर, प्रणयलतिकेवर झुलत असते
सारा आसमंत भारावून जातो त्या गंधाने
हे प्रणयचंचले
नित्य नवे गीत गात किती नाचशील अजून !
जाणत नाहीस तू रोज होणाऱ्या आदिमांच्या कत्तली?
दिशाहीन जीवन जगताना
एखाद्या पाशवी शक्तीसमोर त्यांचे नागवले जाणे
थोडा विरोध होताच
भोसकणे, जाळणे, आयाबहिणींचे धिंडवडे काढले जाणे
घरेदारे पेटवून सारा संसार उधळून लावणे
तू कां लक्षात घेऊ नयेस त्या बलात्कार विनयभंगाच्या बातम्यांना
तुला कां ऐकू येवू नये ती आर्त
मेळघाटमधील आदिम स्त्रीचे गजाआड रडणे
किंवा वर्धा मधील चिमुरड्या आदिपुत्राचे दुधासाठी किंचाळणे
ज्यावेळी त्याची माता पाशवी वृत्तीला बळी पडत असते
आणि म्हातारा आजोबा दीनवाणा रडत असतो कपाळावर हात ठेवून
हे कमलनयनी
तुला तारूण्यासोबतच आग फुलवायची आहे वेदनेची
त्या रसाळवाणीतून मंगलगीत गायचे आहे. क्रांती
-विद्रोहाचे भस्म कर जळजळीत नेत्रकटाक्षाने
तरच तुझे नाचणे
खऱ्या अर्थाने आनंदपर्वाचे होईल.

# प्रित

- सौ. उषाकिरण आत्राम

रिठे चोळून चोळून तिने अंग साफ केले
मोहाचे तेल केसांना माखले
लाकडी काकई केसात खोवून
गर्दरानपालवितून ती निघाली
चोरपावलांनी इवल्या सशासारखी
प्रियकराला भेटायला उधानल्या रानासारखी!
झाडीत लपून "तो खोऽखो करीत हसला
झरणाऱ्या झरण्यासारखा!"
"फांदीवरचा पाखरांचा थवा भुर्रदिशी उडाला
आभाळभर फेकलेल्या केवड्यांच्या
पाकळ्यांसारखा "!
तशी ती फुलारली मोरणीसारखी !
अगे राणे! तुला करायची हाय लढाई !
तिच्या देहावर तरारूण निवडूंग काटे फुटले
त्याने पेटती मशाल दिली तिच्या हातात
ती हसली "तारपाकिंगरीच्या सुरासारखी"!
त्याचा ढोलासारखा आवाज
रानबांधवांनो! एकसाथ पुढं यार !
इथं नासवली आदिम खोरी
इथं चालली अत्याचार लढाई
इथं लुटली आदिम मथुरा
फासावर गेला बिरसामुंडा
एकलव्याचा नेमबाज अंगठा
चुकती करूया, ही बेमुर्वत हरामखोरी
धुवून काढू, नासवलेली आदिमखोरी
रान फुलारलं, डवरलं, उधानलं, वाऱ्यासंग हसलं
आदिम मोर्चा–रानकपारीतून पुढे आला
ती गर्रजली "प्रियतमा पहिली लढाई आपलीचं"!
पावलापावलावर लाल पळसफुलांचा सडा
गर्भारमोहाची जडावली झाडं हलली फुलली
पिवळ्याधम्म मोहफुलांनी बरसून
तिची ओटी भरली
तिच्या प्रितीला नशा चढली
क्रांती, बदला, संघर्ष, स्वातंत्र्य अधिकार
मानुसपण मिळविण्यासाठी
तिचं रक्त सळसळून पेटलं
प्रत्येक मोहाचं गर्भारझाड
तिनं गदगदून हलवलं
उगवत्या सुर्याच्या लालकेसरी सुर्यलाटासोबत!
रानाचे रस्ते पळसपाकळ्यांनी सजून
पिवळी मोहफुलं तिचेवर वर्षाव करू लागली
तिच्या हातातली पेटती मशाल
आकाशाकडे झेपावू लागली
तिच्या उरातलं सपान साकार करण्यासाठी
तिने धनुष्य उचलले
तो तिच्या केसात रानफुलाचा गजरा
माळत होता...
समोरचा झरवा...खळाळून वाहत होता....
दुरवर....उलगुलान ! उलगुलान!
गगनभेदी हुंकार रानभर धावत होते!

# “बेश्टशेलींग पोयट”

- भुजंग मेश्राम

आवं आवं ! मिस्टर बेस्टसेलींग पोयट ऽ ऽ
थुमच्या खरेदी-इक्रीची होआव कसी वळक

थुमची पुस्तकां उडत्यात मनं साता समदूरापार
गावोगावी देत हिंडता कसी येशाची ढेकार

पडछाया - परकाया प्रवेसाची बोंब चालली जोरात
थुमच्या गोधड झुलाचा काय सांगावा रूबाब

पयलं बूक छापल्यावर वाटली अभिप्रायार्थ सिरनी
मनायले लोक, यानं साहित्याला केली करनी

वादग्रस्त झाल्याने प्राप्त होते परसिद्धी
इस पंचविस वर्साच्या शिमग्याची बंडखोर पिडी

शेअर बजारात नवकरीचा कामाला आला आनभाव
कवी संमेलनामंदून धुंदाळत लोकांचं गाव

मायकल जॅक्ससननं काहून केली प्लास्टिक सर्जरी ?
रंग बदलून लिवली ब्लॅक अँड व्हाइट हिस्टरी

एकलव्यानं गुरूदक्सून पिकवलं लव्हळीचं गवत
मेनस्ट्रिमच्या धारमंदी रहावं सळसळत

माया आंजलोनं पटवला बेश्ट शेलींग किताब
भुरट्या चोराला हटवून केला नवाळीचा आदाब

हिजड्यावानी घेतल्या टाळ्या कि भेटतो मोठा मक्ता
छापिल मॅटरचा आता कोण घेतो लगदा

पुस्तकाच्या पिंज-यातून पांढरा पांढरा धुपट
माझा मला पाळता येईना पाळीव रानटी पोपट

# सांग राणे ?

- सौ. उषाकिरण आत्राम

झडतो इथे फुलणाऱ्या पाकळ्यांचा मळा
सर्वांनीच तूला आपापल्या सोईनं
नाचवलं, नासवलं, नागवलं...
कुठली अरण्य सांगवून टाकावित
म्हणजे, सापडेल तुझा आरसपानी चेहरा?
रानाच्या गर्भारवाटा फक्त तुलाच ठावं
गुप्तधनाच्या गुप्तवाटेसारखं
तुही गुप्तखजानाच रानावनाचा!
काळ्याकुट्ट अंधारातून
ठिपकणारं तुझं उष्णवासाचं रक्त
डोहाच्या अंधारतळासारखा
तुही घुप्पगडप झालेले काळोख आत्मा
हिरव्यागर्द बांबुच्या कोंबानाही
असतात संरक्षणासाठी
काळेशार टोकदार काटे
आणि मातीआड दडलेल्या कंदानाही असते
जहाल जहर-जीव घेणे
तुझं निर्विकार ओठमात्र
पिवून टाकते सारं - पोट आगीच्या वणव्यानं
आणि सागाच्या पानाएवढं तुझं आभाळ आरसा
फुटून निघतो ओठातून गोड हसू
टिचल्या गुंजाच्या फळागत
सांग राणे? कच्च्या गुप्त खजान्यासाठी
थांबलीस हिथस आजवर ?
दिसभर कोऱ्या उन्हात ठिवल्यावर
ताडी गोरघ्यालाही आंबूटनशा चढते
टेंभुर्णीची काटकी सुकली तरी
पेटता पेटता फटाफट्...,
तिडक्या उडवून वळख देते
तु मात्र, ढंडार ढेमस्यातच डुंबून जातेस
सांग राणे? तु कुठल्या भारताच्या मातीआड
राहतेस?
सांग? तु कुठल्या भारताचं गीत गातेस?
रानशे ! आता तरी बोलती हो!
आता तरी बोलती हो!!

# "पिलेग"

- भुजंग मेश्राम

पिकावर एंड्री मारतांना तोंडावर रूमाल
बोडके तेवडे कान
व्हाग पाठीशी लागल्यावानी पळापळ
मला कळना झालं
अफवेला बी असतो का बाट?

पळा पळा पळा पळा !
वाटांनी पळा पळवाटांनी पळा
सुरक्षित जागी आरक्षीत जागी पळा
जेथून आलो तेथे पळा
खेड्याकडे चला !

कुणाला जोडतो हात, कुणाला विनवण्या
कोण कुणांसाठी थांबतो ?
थांबला तो संपला
या महामारीचा संप फोडायला शामत आली का?
एकाला हात धरून चौकशी केली आस्थेनं
तो बोंबलला ; पिलेग पिलेग -

अन् गडी सूं बाल्या करीत पळाला थेट
दुसऱ्याचे डाय मारून पकडले पाय
असा कसा नवा रोग आला?
त्याची एक दोन लक्षणं तरी सांगा -
जंगली उंदराच्या अंगावरल्या पिसवांचा
शहरी उंदराच्या पिसवांशी झाला मेल
कि हा रोग होतो सर्वत्र
चल पाय सोड -

जादू टोण्यावर कोणाचाच नस्तो इस्वाद
जवर यवून टाकत नाय ते पुढ्यात
मारली मूठ कि रगताची उल्टी
खूठ रोवली कि मरतात गाभन गाई
जादू टोणा मंजी विच्छा माजी पुरी करा
अन् भूतबाधा मंजी
भूतकाळाची वर्तमानाला झालेली बाधा

डाकतर मास्तर कवी मंत्री शास्त्रज्ञ इचारवंत महंत
यकायकी कुणालाबी आला नाही अंदाज
हवामान खातं बसलं हवा खात
जोतिष बोवा बसले कोरत हात
ठिव्ही बसली झायराती देत
आकासवानी हवेत झोके घेत
सरकार बसवते कमिटयावर कमट्या
सगळेच कसे

मस्त मस्त वागतात घरंदाज
कोणं नाय घेतला संवशय
ना कोणं काढला इशय
पिलेग फिरू लागला शहर न शहर !
दुर्बीणीखाली पिसव्याला धरून
डागदरांनी केली डिएनसी चाचणी
पिसवा पिशासारखा हसला
भाडोत्री मारेकऱ्या सारखा थंड बसला
शोधा शोधा !

मी कोण प्रोटोलॉइड कि ऑस्ट्रोलॉईड ?
कुठल्या युगात ठरवणार माझा वंश?
कुठल्या भाषेच्या चिमटीन
सापडणार मी घट्ट?
इतिहासाला समांतर माझे संक्रमण
त्यानंतर, सर्वजण सोडवत बसले कोडं

पिसवा म्हणाल्या, मी आहे सर्वत्र
रक्तपेशी सारखा मनात, सर्वच
वर्ण, वर्ग, वंश, लिंग नी जातीत
मी ब्राम्हण्य, कारूण्य, हवा नी शाळा

तुम्ही जेवढे पळाला सैरावैरा
तेवढा मी होईन दुर्बोध
पळवाटेत मोजाल व्याख्या,

ओळख परेड साठी अस्वस्थ पिसवा
ओळख असून पिलेग फसवा.

# सूची


| | |
|---|---|
| अंक पहिला : जानेवारी -मार्च | १९८० - जबरन जोत जंगल जमीन |
| अंक दुसरा : एप्रिल-जून | १९८० - आदिवासी व शिक्षण |
| अंक तिसरा : जुलै-सप्टेंबर | १९८० - आदिवासी व वनसंवर्धन |
| अंक चौथा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८० - आदिवासी साहित्य व कला |
| अंक पाचवा : जानेवारी-मार्च | १९८१ - दलितांना सवलती व राखीव जागा माहिती |
| अंक सहावा : एप्रिल-जून | १९८१ - आदिवासी व आरोग्य |
| अंक सातवा : जुलै-सप्टेंबर | १९८१ - रोजगार हमी योजना |
| अंक नववा : जानेवारी-मार्च | १९८१ - उत्तराखंड अभ्यास मोहीम |
| अंक दहावा : एप्रिल-जून | १९८२ - धरणे व विकास |
| अंक अकरा-बारा : जुलै-डिसेंबर | १९८२ - जंगल व्यवस्थापन |
| अंक तेरावा : जानेवारी-मार्च | १९८३ - आदिवासी व दारू |
| अंक चौदावा : एप्रिल-जून | १९८३ - आदिवासींच्या सामाजिक / राजकीय चळवळी |
| अंक पंधरावा : जुलै-सप्टेंबर | १९८३ - प्रा. सरदार गौरव अंक / आदिवासी साहित्य |
| अंक सोळावा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८३ - आदिवासी साहित्य व सामाजिक प्रश्न |
| अंक सतरा-आठरा : जानेवारी-जून | १९८४ - आदिवासींमधील स्वयंसेवी कार्य |
| अंक एकोणिसावा : जुलै-सप्टेंबर | १९८४ - आदिवासी स्त्री |
| अंक विसावा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८४ - आदिवासी आरोग्य व शिक्षण |
| अंक एकविसावा : जानेवारी-मार्च | १९८५ - आदिवासी संघटन |
| अंक बाविसावा : एप्रिल-जून | १९८५ - जमीन हस्तांतर |
| अंक तेविसावा : जुलै-सप्टेंबर | १९८५ - आदिवासी महिला. |
| अंक चोविसावा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८५ - आदिवासी व सरकार |
| अंक पंचविसावा : जानेवारी-मार्च | १९८६ - जंगल व धरण |
| अंक सव्विसावा : एप्रिल-जून | १९८६ - आदिवासी कला |
| अंक सत्ताविसावा : जुलै-सप्टेंबर | १९८६ - आदिवासी व वेठबिगारी |
| अंक अठ्ठाविसावा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८६ - आदिवासीविषयक ग्रंथ मानवशास्त्र परिचय |
| अंक एकोणतिसावा : जानेवारी-मार्च | १९८७ - भटक्याविमुक्त जमातींचे प्रश्न |
| अंक तिसावा : एप्रिल-जून | १९८७ - आदिवासी आणि सांस्कृतिक बदल |
| अंक एकतीस-बत्तीस : जुलै-डिसेंबर | १९८७ - राष्ट्रीय वननीतीचा प्रश्न |
| अंक तेहतीस : जानेवारी-मार्च | १९८८ - सवलती अपहरणाची समस्या |
| अंक चौतीस : एप्रिल-जून | १९८८ - आदिवासी साहित्य |
| अंक प्स्तीस-छत्तीस : जुलै-डिसेंबर | १९८८ - आदिवासी समाज व संस्कृती |
| अंक सदतीस-अडतीस : जानेवारी-जून | १९८९ - डॉ. वेरीअर एलवीन विशेषांक |
| अंक एकोणचाळीस-चाळीस : जुलै-डिसेंबर | १९८९ - व्यवसाय मार्गदर्शन |
| अंक एकेचाळीस-बेचाळीस : जानेवारी-जून | १९९० - महाराष्ट्रातील आदिवासींची परिस्थिती |
| अंक त्रेचाळीस : जुलै-सप्टेंबर | १९९० - जागतिक आदिवासी |
| अंक चव्वेचाळीस : ऑक्टोबर-डिसेंबर | १९९० - गं. बा. सरदार स्मृति विशेषांक |
| अंक पंचेचाळीस-सेहेचाळीस : जानेवारी-जून | १९९१ - आदिवासी साहित्य संमेलन विशेषांक |
| अंक सत्तेचाळीस : जुलै-सप्टेंबर | १९९१ - आदिवासींच्या विकासात्मक व सांस्कृतिक समस्या |
| अंक अठ्ठेचाळीस : ऑक्टोबर-डिसेंबर | १९९१ - आदिवासी जीवन व संस्कृती |
| अंक एकोणपन्नास-पन्नास : जानेवारी-जून | १९९२ - सर्वसाधारण आदिवासी |
| अंक एक्कावन-बावन : जुलै-डिसेंबर | १९९२ - अनुताई वाघ विशेषांक |
| अंक त्रेपन-चोपन्न : जानेवारी-जून | १९९३ - आदिवासी धर्म, सण व उत्सव |
| अंक पंचावन-छप्पन : जुलै-डिसेंबर | १९९३ - धरण-विस्थापन व पुनर्वसन |
| अंक सतावन : जानेवारी-मार्च | १९९४ - सर्वसाधारण आदिवासी |
| अंक अठ्ठावन्न : एप्रिल-जून | १९९४ - आदिवासी एकता परिषद |
| अंक एकोणसाठ : जुलै-सप्टेंबर | १९९४ - आदिवासी विकासाची सैद्धान्तिक भूमिका |
| अंक साठ : ऑक्टोबर - डिसेंबर | १९९४ - आदिवासी जमाती |
| अंक एकसष्ठ - बासष्ठ : जानेवारी - जून | १९९५ - राणीपूर विशेषांक |
| अंक त्रेसष्ठ : जुलै-सप्टेंबर | १९९५ - कुपोषण विशेषांक |
| अंक चौसष्ठ : ऑक्टोबर - डिसेंबर | १९९५ - पर्यावरण विशेषांक |
| अंक पासष्ठ : जानेवारी - मार्च | १९९६ - आदिवासी जमाती |
| अंक सासष्ठ : एप्रिल - जून | १९९६ - महाराष्ट्र, ओरिसा - अभ्यास दौरा |

Registered with the Registrar of News Papers of India Under No. 35835/80

## महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन, कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण.

शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकत्र व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे.

मानव विज्ञान व सामाजिक शास्त्र यांच्या शिक्षकांना व विचारवंतांना, मुख्यत: आदिवासींबाबत अभ्यासकांना एकत्र आणणे.

मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन, प्रकाशन.

या उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशाचे मूर्त स्वरुप म्हणून 'हाकारा' त्रैमासिक सुरु करण्यात आले आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारुन आपणही या कार्यात सहभागी व्हावे. (संस्थांना फक्त 'हाकारा' चे वार्षिक सदस्यत्व मिळेल)

## मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व

आजीव सभासद ५०० रुपये (फक्त व्यक्तींसाठी)

हाकारा वार्षिक सभासद ५० रुपये (व्यक्ती व संस्था दोन्ही)

परिषदेच्या सभासदांना 'हाकारा' विनामूल्य पाठविला जातो. आपले सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया खालील पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' (दि महाराष्ट्र असोसिएशन ऑफ ॲन्थ्रॉपॉजिकल सायन्सेस) यांचे नावे डिमांड ड्राफ्ट अथवा मनी ऑर्डरने पाठवावी. मनीऑर्डर करताना फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नाव पूर्ण पत्ता लिहिण्यास विसरू नये.

**पत्रव्यवहाराचा पत्ता :**

रा. के. मुटाटकर, सचिव

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

६४, आनंद पार्क, औंध,

पुणे - ४११ ००७.

**आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा आहे.**

Printed by Jnana Prabodhini Mudran Vibhag, Pune - 30.